










# शिक्षण परिषद

## संकल्पना आणि प्रक्रिया मार्गदर्शिका

**२०१९**

महाराष्ट्र शासन

EdelGive Foundation
An Edelweiss Initiative

ज्ञानसेवा तु साफल्यम्
म.रा.शै.सं.व प्र.प.(विद्या प्राधिकरण)

gyan prakash
FOUNDATION

# शिक्षण परिषद

## संकल्पना आणि प्रक्रिया मार्गदर्शिका

## २०१९


महाराष्ट्र शासन

EdelGive Foundation
An Edelweiss Initiative

ज्ञानसेवा तु साफल्यम्
म.रा.शै.सं.व प्र.प.(विद्या प्राधिकरण)

gyan prakash
FOUNDATION

# शिक्षण परिषद

## संकल्पना आणि प्रक्रिया मार्गदर्शिका

## २०१९

**प्रकाशक :**
ग्यानप्रकाश फाउंडेशन
३०२, ऑर्चड, डॉ. पै मार्ग, नचिकेत पार्क,
बाणेर, पुणे -४११०४५
फोन : ०२० - ६५२९२८०८

**मांडणी व मुद्रण :**
संस्कृती डिझायनर्स, पुणे
२१६, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०
फोन : ०२० - २४३२१८८४

सदर प्रक्रिया अथवा पुस्तिकेबाबत आपल्या काही सूचना, प्रतिक्रिया असल्यास कृपया आम्हाला feedbackgyanprakash.org किंवा contactus.edelgiveedelweissfin.com वर संपर्क करावा.

# संदेश



**श्री. विशाल वसंत सोळंकी**
आयुक्त शिक्षण तथा संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.

महाराष्ट्रासारखे पुरोगामी व प्रगतीशील राज्य शैक्षणिक व सामाजिक बदलांमध्ये नेहमीच अग्रेसर राहिले आहे. राज्यातील १००% मुले शिक्षणाच्या प्रवाहात यावीत, नियमित रहावीत व त्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी शासन नेहमीच प्रयत्नशील आहे.

प्राथमिक शिक्षण हा बालकांच्या विकासाचा पाया आहे. या दृष्टीने शिक्षकांना मुलांच्या शैक्षणिक गरजांची नेमकी जाण असणे व त्यानुसार प्रत्येक मुलाच्या प्रगतीसाठी नियोजन करणे गरजेचे आहे. 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' या शासन निर्णयाच्या संदर्भाने गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण हे केंद्रस्थानी ठेवून केंद्रप्रमुखांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षकांच्या क्षमता वृद्धीचे व्यासपीठ म्हणून दरमहा केंद्रपातळीवर 'शिक्षण परिषद' आयोजित करणे आवश्यक आहे. प्रभावी शिक्षण परिषदांसाठी केंद्र संसाधन समूह सक्रीय असणेही गरजेचे आहे.

केंद्र संमेलनाच्या ऐवजी शिक्षण परिषद प्रक्रिया ही नावानुसारच केवळ शिक्षकांचे संमेलन नव्हे तर अभ्यासपूर्ण चर्चांची, गुणवत्ता विकासाची निश्चित दिशा व कार्ययोजना ठरवणारी व त्यासाठी शिक्षकांना सक्षम करणारी अशी ठोस प्रक्रिया आहे. केंद्रस्तरीय नियोजन हे प्रत्येक मूल, प्रत्येक शाळा यांच्यापर्यंत तर पोचतेच पण अशा अनेक केंद्रात सातत्याने घडणाऱ्या बदलांमध्ये संपूर्ण तालुका, जिल्हा यांना बदलायची ताकद आहे. गेल्या तीन वर्षांमध्ये काही केंद्रांमध्ये ही प्रक्रिया अत्यंत प्रभावीपणे राबवली जात आहे व अशा केंद्रांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने लक्षणीय सुधारणा होताना दिसत आहे. अशाच प्रभावी शिक्षण परिषदांची अंमलबजावणी जर राज्यातील प्रत्येक केंद्रात झाली, तर राज्यातील शैक्षणिक गुणवत्ता विकासाला निश्चितच गती येईल. सदर प्रक्रिया राबविण्यासाठी केंद्रप्रमुखांना सहाय्यभूत ठरेल अशा मार्गदर्शिकेची गरज होती ती या पुस्तिकेद्वारे पूर्ण होईल अशी आशा आहे.

या पुस्तिकेचा उद्देश राज्यातील शिक्षण परिषद प्रक्रियांच्या अंमलबजावणीमध्ये एकवाक्यता आणणे व शिक्षण विभागातील विविध स्तरावरील यंत्रणांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करणे हा आहे.

शिक्षण व्यवस्थेतील आपण सर्व या मार्गदर्शिकेचा उपयोग करत आपापली भूमिका अधिक सजगपणे आणि सक्षमतेने पार पाडूया व मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीच्या आपल्या उत्तरदायित्त्वाला कटिबद्ध होवूया.

शुभेच्छा!!

**श्री. विशाल वसंत सोळंकी**

# अनुक्रमणिका

प्रस्तावना ........ ५

पुस्तिका हेतू ........ ७

१. शिक्षण परिषद -शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया ........ ८

२. शिक्षण परिषद- सद्यस्थिती - निरीक्षणे ........ ९

३. शिक्षण परिषद म्हणजे काय? व्याख्या........ १०

४. शिक्षण परिषद कशासाठी- उद्देश्य ........ ११

५. शिक्षण परिषद प्रक्रिया - मार्गदर्शक सूचनांसह ........ १२

६. शिक्षण परिषदेच्या आधी ........ १३

७. शिक्षण परिषदेच्या दिवशी ........ १७

८. शिक्षण परिषदेनंतर........ २१

९. प्रभावी शिक्षण परिषदेतून काय साध्य होते?- अपेक्षित फलनिष्पत्ती ........ २५

१०. शिक्षण परिषद प्रकिया परिणामकारकता मापन प्रश्नावली-स्वयं-मूल्यमापन ........ २७

११. शिक्षण परिषदेसाठी महत्त्वाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या ........ ३०

१२. निरंतर व प्रभावी प्रक्रियेसाठी काय करावे........ ३६

१३. शंका समाधान ........ ३८

१४. एडलगिव्ह फाऊंडेशन आणि 'दि कॉलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन' बाबत ........ ४०

१५. ग्यानप्रकाश फाउंडेशन - संस्था संक्षिप्त परिचय ........ ४२

१६. बदलांच्या पाऊलखुणा ........ ४५

संदर्भ ........ ५२

# प्रस्तावना

गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणे हा प्रत्येक मुलाचा हक्क आहे. यासाठी शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे कारण प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये शिक्षकांचा थेट सहभाग असतो. शिक्षणाच्या क्षेत्रात सतत वेगवेगळे अभ्यास होत असतात. त्यातून मुलांचे शिकणे आनंददायी व प्रभावी करणारे अनेक मार्ग समोर येतात. तसेच बदलत्या सामाजिक परिस्थितीचा प्रभाव पण शिक्षण प्रक्रियेवर पडत असतो. यामुळे बदलत्या शैक्षणिक गरजा, धोरणे, शिक्षणासंबंधी नवीन प्रयोग, अभ्यास व निष्कर्ष याविषयी शिक्षकांनी अद्ययावत असणे हे अत्यंत गरजेचे ठरते.

शिक्षकांना प्रत्यक्ष वर्गात मुलांसोबत काम करताना अनेक अडचणी, प्रश्नांचा सामना करावा लागतो. हे प्रश्न एकट्याने सोडवू बघितले तर तो विचार एकांगी होतो,पर्यायांवर मर्यादा येतात. या उद्देश्यानेच पूर्वी सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षणे आयोजित केली जायची. शालेय शिक्षणात गुणवत्ता निश्चित करायची असेल तर शिक्षक प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे. परंतु अनुभवातून असे लक्षात आले की प्रशिक्षणाच्या पारंपारिक पद्धतींना मर्यादा आहेत. तज्ज्ञ मार्गदर्शन दिशा देत असले तरी, प्रत्यक्ष वर्ग प्रक्रिया नियमित राबवणाऱ्या इतर शिक्षकांशी संवाद साधणे, त्यांचे अनुभव ऐकणे, त्यांनी केलेले प्रयोग समजून घेणे, यामुळे शिक्षकांना त्यांचे प्रश्न/अडचणी अधिक नेमकेपणाने समजायला मदत होते. तसेच त्याला अनुरूप असे व्यवहार्य पर्याय, नवीन दृष्टीकोनदेखील सापडतात. हे उपाय, कल्पना अनुभवसिद्ध असल्यामुळे शिक्षकांना, ते वर्गात मुलांसोबत प्रत्यक्ष वापरून बघण्याची प्रेरणा मिळते. अशा शैक्षणिक आदान प्रदानातून उपक्रमशील शिक्षकांच्या कामाचे कौतुक होते व इतर शिक्षकांचाही हुरूप वाढतो.

या धर्तीवर 'सर्व शिक्षा अभियाना' अंतर्गत समूह साधन केंद्रस्तरावर, केंद्रसंमेलन अथवा गटसंमेलनांचे आयोजन केले जात होते, यामध्ये सर्व शिक्षक महिन्यातून एकदा एकत्र येत असत. केंद्राअंतर्गत शाळांमधील नाविन्यपूर्ण उपक्रम, आदर्श अध्ययन-अध्यापनप्रक्रिया, आणि त्या अनुषंगिक प्रशिक्षणे यांचा या प्रक्रियेत समावेश असे. कालांतराने निधी अभावी संमेलने बंद झाली, पण प्रत्येक मुलाच्या गुणवत्ता वाढीचा विचार करताना केंद्रस्तरीय नियोजन, आढावा व नाविन्यपूर्ण उपक्रमांचा प्रसार अशा शैक्षणिक देवाणघेवाणीसाठी हे व्यासपीठ प्रेरक व उपयुक्त ठरते असा सर्वांचाच अनुभव होता. एकूणच शैक्षणिक प्रगतीसाठी शिक्षकांनी अनुभव समृद्ध असणे, प्रयोगशील असणे, एकमेकांच्या अनुभवातून शिकणे गरजेचे आहे या विचारातून शिक्षण परिषद ही संकल्पना अस्तित्वात आली.

१ सप्टेंबर २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार केंद्र संमेलनांच्या धर्तीवर घेतल्या जाणाऱ्या या परिषदांचा मूळ उद्देश हा 'प्रत्येक मूल शाळेत- प्रत्येक मूल प्रगत' हे ध्येय प्रत्यक्षात आणण्यासाठी, केंद्रातील सर्व शिक्षकांनी एकत्रित येऊन शैक्षणिक गुणवत्ता, विविध अध्ययन-अध्यापन पद्धती, एकमेकांचे उपक्रम व अनुभव यांचे आदान प्रदान करणे, तसेच अध्ययन निष्पत्तीमधे मागे पडलेली, सतत गैरहजर, स्थलांतरीत

व अध्ययन अक्षम असणारी मुले यावर चर्चा करून नियोजनाद्वारे एकत्रीत उपाययोजना आखणे हा आहे. शिक्षकांसाठी बाह्य तज्ञ प्रशिक्षणे आयोजित करून शैक्षणिक समस्यांवर साचेबद्ध उपाय न शोधता त्याऐवजी ज्या स्थानिक शिक्षकांनी प्रत्यक्ष काम करून बदल घडवून आणले आहेत, अशा शिक्षकांना स्वतःचे काम/विचार/नवोपक्रम सादर करण्याची संधी व प्रोत्साहन मिळावे हा आहे. अशा नियमित आदर्श शिक्षण परिषदांद्वारा आपआपले वर्ग/शाळा यांखेरीज इतरत्र काय नाविन्यपूर्ण चालले आहे याचा विचार होऊन १००% मुलांना क्षमताप्राप्ती होण्यासाठीची दिशा शिक्षकांना मिळते.

हा उद्देश साध्य होण्यासाठी शिक्षण परिषदांकडे केवळ एक औपचारिकता अथवा प्रशासकीय कामांसाठीची मासिक बैठक असे संकुचितपणे न बघता, १००% मुले 'येतात-टिकतात-शिकतात' यासाठी केंद्रप्रमुखांच्या नेतृत्वात शिक्षकांचे, शिक्षकांसाठी, शिक्षकांनी चालविलेले एक केंद्रस्तरीय प्रभावी व्यासपीठ म्हणून बघायला हवे.



# पुस्तिका हेतू



शिक्षण परिषदेचा इतक्या व्यापक दृष्टीकोनातून विचार केला आहे तर प्रत्यक्ष शिक्षण परिषद कशी होते?

आदर्श शिक्षण परिषद म्हणजे काय? त्याचे निकष कोणते?

अपेक्षित शिक्षण परिषद आणि प्रत्यक्षातील परिषद यांच्यात काही फरक आहे का?

असल्यास तफावतीची कारणे काय?

शिक्षण परिषदेच्या परिणामांचे मोजमाप कसे करायचे?

शिक्षण परिषदांची अपेक्षित फलनिष्पत्ती काय?

'ग्यानप्रकाश फाउंडेशन' महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळा, शिक्षक व शिक्षण व्यवस्था यांच्या सोबत काम करत असताना शिक्षण परिषद प्रक्रियेबाबत सर्वच स्तरांवर एकवाक्यता येणे आवश्यक आहे हे जाणवले. येथे सर्वांत महत्त्वाचा प्रश्न तर हा आहे की 'शिक्षण परिषद' या प्रकियेला एवढे महत्त्व का आहे? या प्रश्नाचे उत्तर समजून घेतानाच या विषयाच्या सविस्तर मांडणीची गरज लक्षात येते.

**या पुस्तिकेचा हेतू शिक्षण परिषदेचा सविस्तर विचार करणे व ही संकल्पना, आदर्श प्रक्रियेचे अपेक्षित टप्पे, व काही चांगली उदाहरणे यांसह मार्गदर्शिका स्वरूपात समोर मांडणे हा आहे. याद्वारे या संकल्पनेविषयी एकवाक्यता येऊन, प्रक्रियेची प्रभावी अंमलबजावणी होईल व राज्यातील प्रत्येक मुलाची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची वाटचाल सुकर होईल असे वाटते.**

# १ शिक्षण परिषद –
# शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया

प्रत्येक मुलाला त्याच्या वयानुरूप अपेक्षित मूलभूत क्षमता प्राप्त होणे हे शिक्षण प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अभ्यासक्रमाची रचना ही त्या क्षमतांनुसारच केलेली आहे व मुलांचे मुल्यांकनही त्याच आधारे केले जाते. मग वर्गप्रक्रियांची आखणी ही प्रत्येक मूल मुल्यमापनानुसार कोठे आहे हे समजून घेऊन तेथून मुलांना त्यांच्या अपेक्षित क्षमतांपर्यंत नेणारी असली पाहिजे. यासाठी शिक्षकांची दृष्टी आणि कौशल्ये विकसित होणे गरजेचे असते. अध्यापन प्रक्रियेत परिवर्तन येण्यासाठी या सर्व घटकांचा सहसंबंध अभ्यासला जाणे महत्त्वाचे आहे. या सर्व घटकांचा साकल्याने विचार जेथे घडू शकतो असे **सामायिक व्यासपीठ म्हणजे 'शिक्षण परिषद'.** म्हणूनच 'शिक्षण परिषदेची-शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया' ही ताकद ओळखून ती प्रभावीपणे प्रत्यक्षात आणणे गरजेचे ठरते.




### प्रत्येक मूल शिकण्यासाठी शिक्षण परिषद

- मूल/वर्ग/शाळा निहाय नियमित नियोजन व आढावा गरजेचा,
- शिक्षकांना उपक्रम मांडण्यासाठी व्यासपीठ व शिक्षकांत संघभावना निर्माण होणे व सकारात्मक स्पर्धा असणे गरजेचे,
- दैनंदिन प्रक्रियेतून बाहेर येऊन नवीन दृष्टीकोन/भूमिका/प्रयोग समजून घेण्याची संधी आवश्यक,
- केंद्रप्रमुख व शिक्षकांच्या समन्वयातूनच अपेक्षित बदल शक्य.

प्रत्येक मूल शिकण्यासाठी शिक्षण परिषद

# २ शिक्षण परिषद – सद्यस्थिती निरीक्षणे

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील अनेक शिक्षण परिषदांचे प्रत्यक्ष निरीक्षण करून व अनेक शिक्षक, अधिकारी यांच्याशी चर्चा केल्यावर शिक्षण परिषदेबाबत या बाबी समोर आल्या.

## सद्यस्थिती – सकारात्मक निरीक्षणे

- जिल्हा पातळीवरून शिक्षण परिषदेचा अजेंडा येऊ लागल्यामुळे नियोजनाबाबत दिशा मिळण्यास सुरुवात,
- शिक्षण परिषदांची सुरुवात झाल्यामुळे त्यानिमित्ताने शिक्षक एकत्र येऊन काही विषयांवर चर्चा करण्यास सुरुवात झाली आहे,
- सक्रीय आणि सकारात्मक शिक्षकांना एका व्यासपीठावर सादरीकरणाची संधी,
- पर्यवेक्षकीय यंत्रणा शिक्षण परिषदेमध्ये सहभागी होण्यास सुरुवात,
- शिक्षण परिषदांच्या पूर्वनियोजनासाठी केंद्र समूह साधन बैठकांचे (CRG) आयोजन होण्यास सुरुवात.

## सद्यस्थिती – सुधारणेला वाव

परंतु बहुतेक ठिकाणी मात्र खालील निरीक्षणे समोर येतात.

- शिक्षण परिषदेचा मूळ उद्देश अजूनही सर्वांपर्यंत नेमकेपणाने पोचलेला नाही,
- शिक्षण परिषदांचे स्वरूप केवळ एकदिवसीय शिक्षक बैठक अथवा मेळा इतकेच सिमित,
- शिक्षण परिषदांच्या आयोजनामध्ये नियमितता, नियोजन व मुद्देसूदपणा यांचा अभाव,
- शैक्षणिक चर्चांऐवजी फक्त प्रशासकीय मुद्द्यांचा समावेश अथवा त्यावरच भर,
- आवश्यक पूर्वतयारी, दिशादर्शक नेतृत्त्व व सहभागींचा अभ्यासपूर्ण सक्रीय सहभाग यांचा अभाव,
- शिक्षण परिषदेतील नियोजन, अनुभव यांचा उपयोग प्रत्यक्ष वर्गप्रक्रियेत केलेला न दिसणे,
- पर्यवेक्षीय यंत्रणेचे नेतृत्त्व, प्रत्यक्ष वर्गभेट, मार्गदर्शन, पाठपुरावा यांचा अभाव.

गुणवत्ता विकासात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता ‘शिक्षण परिषद’ या प्रक्रियेमध्ये आहे. हे लक्षात घेता महाराष्ट्रातील सर्व केंद्रातील शिक्षण परिषदा प्रभावी होणे किती आवश्यक आहे हे लक्षात येते. याकरिता शिक्षण परिषद ही संकल्पना व त्याची आदर्श प्रक्रिया या बद्दल आता सविस्तर विचार करूयात.

गुणवत्ता विकासात मूलगामी परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता ‘शिक्षण परिषद’ या प्रक्रियेमध्ये आहे

# ३ शिक्षण परिषद म्हणजे काय? व्याख्या




प्रत्येक मुलाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी, शिक्षकांच्या क्षमताबांधणीचे व्यासपीठ म्हणजे शिक्षण परिषद, जिथे केंद्रातील सर्व शिक्षक, दरमहा केंद्रप्रमुखांच्या नेतृत्त्वाखाली एकत्र येतात, संख्यात्मक माहितीच्या आधारे शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेतात, तसेच गुणवत्ता वाढीचे नियोजन करतात व याद्वारे विविध अध्ययन-अध्यापन पद्धती, नवोपक्रम व प्रत्यक्ष अनुभव यांचे आदान प्रदान करत स्वतःची शैक्षणिक समज व कौशल्ये यांच्या विकासासाठी प्रयत्नशील राहतात.

# ४ शिक्षण परिषद कशासाठी – उद्देश

**शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यामागचे उद्देश खालीलप्रमाणे :**

- संपूर्ण केंद्र शाळाबाह्य मूलविरहीत करण्यासाठीचे नियोजन व उपाययोजना करणे,
- १००% मुलांची नियमित उपस्थिती राखण्यासाठी शिक्षकांना सक्षम करणे,
- शैक्षणिक चर्चा व आदान प्रदान यांसाठी व्यासपीठ शिक्षकांना उपलब्ध करणे,
- शिक्षणातील नवीन संकल्पना सर्वांपर्यंत पोहचून त्याचा दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियांत वापर करण्याची दृष्टी व प्रेरणा मिळणे,
- विद्यार्थी व शाळांसंबंधी माहितीचे सुयोग्य संकलन व विश्लेषण यांच्या आधारे गुणवत्ता विकासाचे नियोजन तयार होणे,
- गुणवत्ता मूल्यांकनाचे निकष समजून घेऊन त्यानुसार शाळा व मुले यांचा शैक्षणिक दर्जा उंचावणे,
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीचे व्यवस्थित आकलन होऊन, तिचा वापर करण्यासाठी शिक्षक सक्षम होणे,
- कुठल्याही बाह्य घटकावर अवलंबून न राहता केंद्रांतर्गत चर्चेतूनच शैक्षणिक समस्यांवर उपाय शोधणे,
- शिक्षकांना वाचन, स्वलेखन, सृजनशीलता, अभिव्यक्ती कौशल्ये यांच्या विकासासाठी प्रेरणा मिळणे,
- उत्साही, प्रयोगशील शिक्षकांना प्रयोग सादरीकरणाच्या संधीतून प्रोत्साहन देणे,
- शिक्षकांनी प्रकल्प, नवोपक्रम व कृती संशोधन करण्यास प्रवृत्त होणे,
- समाज सहभागाचे महत्त्व शिक्षकांना समजून तो मिळविण्यासाठी दिशा मिळणे,
- केंद्रस्तरीय नियोजन, आढावा व नियमित पाठपुरावा यातून शैक्षणिक गुणवत्ता विकासाची दिशा ठरवणे,
- विविध काळात गरजेनुसार ज्या समस्या निर्माण होतात त्यांचे नियोजन करून चर्चेतून मार्ग काढणे. (उदा. स्थलांतरण, धार्मिक सणांच्या काळातील अनुपस्थिती इ.)

केंद्रस्तरीय नियोजन, आढावा व नियमित पाठपुरावा यातून केंद्राच्या शैक्षणिक गुणवत्ता विकासाची दिशा ठरते

# ५ शिक्षण परिषद प्रक्रिया – मार्गदर्शक सूचनांसह


शिक्षण परिषदा या अपेक्षित हेतू साध्य करणाऱ्या व परिणामकारक व्हायला हव्या असतील, तर शिक्षण परिषदेकडे केवळ एक दिवसाची बैठक असे न बघता, या प्रक्रियेचा विचार तीन टप्प्यांत केला पाहिजे.

१) शिक्षण परिषदेच्या आधी- पूर्वतयारी

२) प्रत्यक्ष शिक्षण परिषदेचा दिवस- विषयपत्रिकेनुसार सहभागी प्रक्रिया

३) शिक्षण परिषदेनंतर- पाठपुरावा, शाळा भेटी, वर्गांतर्गत प्रक्रिया व पुढील महिन्याच्या शिक्षण परिषदांचे नियोजन

पुढील आकृतीवरून आपल्याला या तीन टप्प्यांमध्ये विभागलेली शिक्षण परिषदेची प्रक्रिया तसेच प्रत्येक टप्प्यावरील तयारी व जबाबदाऱ्या नेमकेपणाने समजून घेण्यास मदत होईल.




परिणामकारक शिक्षण परिषदांसाठी पूर्व तयारी, प्रत्यक्ष परिषद व नंतरच्या वर्गभेटी हे तिन्ही टप्पे महत्त्वाचे आहेत

# ६ शिक्षण परिषदेच्या आधी




*शिक्षण परिषदेत नवीन उपक्रमाचे सादरीकरण*

प्रभावी शिक्षण परिषदेसाठी नेमकी पूर्वतयारी आवश्यक आहे. त्यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

## ६.१ शिक्षण परिषदेचे स्थळ व इतर आयोजन

- शिक्षण परिषदेची तारीख, वेळ, स्थळ निश्चित करणे,
- स्थळ ठरवताना सहभागी संख्येनुसार जागेची उपलब्धता, बैठक व्यवस्था, शैक्षणिक व डिजिटल साहित्य वापरासंबंधी विचार करणे,
- शिक्षण परिषदेची जागा सगळ्यांना हालचालींसाठी सहज, आरामदायी, मोकळी असावी,
- संबंधित शाळेचे मुख्याध्यापक/शिक्षक यांना आयोजनासाठी मार्गदर्शन करणे,
- केंद्रातील वेगवेगळ्या शाळांमध्ये शिक्षण परिषद आयोजित करता येऊ शकते. यामुळे केंद्रातील प्रत्येक शाळेला भेटी होतात, त्या त्या शाळांचे काम केंद्रातील इतर शिक्षकांना बघण्याची संधी मिळते.

## ६.२ शिक्षण परिषदेचा विषय गरजेनुसार ठरवणे

केंद्रप्रमुख व केंद्र संसाधन गटाने शिक्षण परिषदेमध्ये कोणकोणते विषय घेतले जावेत याचा सखोल विचार व नियोजन आधीच केले पाहिजे. यासाठी-

- जिल्ह्याने /तालुक्याने ठरविलेले विषय व केंद्राच्या गरजा, वार्षिक नियोजन यानुसार विषयपत्रिका ठरवावी,
- मूल्यमापन चाचण्यांचे विश्लेषण करून केंद्राच्या शैक्षणिक गरजा निश्चित कराव्यात व त्यांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुरूप शिक्षण परिषदांचे वार्षिक नियोजन करावे,
- केंद्र प्रमुख आणि/अथवा केंद्र संसाधन गटामध्ये चर्चा शैक्षणिक गरजांनुसार विषय सूची तयार केली जावी. शैक्षणिक गरजा ठरवताना अध्ययन स्तरानुरूप अपेक्षित क्षमतांवर केंद्रातील शाळांच्या संपादणूकीचा विचार करावा. उदा: केंद्रामध्ये एकूण १० शाळा असतील; त्यातील साधारण ८ शाळांतील मुले भाषेमध्ये मागे असतील तर या मुलांच्या प्रगतीसाठी भाषेविषयी विविध उपक्रम शिक्षण परिषद मध्ये मांडावेत. त्यावर काम केलेल्या शिक्षकांना सादरीकरणाची संधी द्यावी,
- केंद्रप्रमुखांनी शाळाभेटी करताना शिक्षकांना अध्ययन-अध्यापनामध्ये येणाऱ्या अडचणी व गरजा लक्षात घ्याव्या. तसेच केंद्रातील उपक्रमशील शिक्षक, नवीन उपक्रम यांना आवर्जून भेटी देत, त्यांचा समावेश परिषदेतील सादरीकरणासाठी कसा करता येईल हे ठरविणे,
- गुणवत्ताआधारित शासन निर्णय,शासन परिपत्रके,योजना व प्रशासकीय विषय यांचा केंद्राच्या गरजांनुसार समावेश करावा,
- केंद्रातील एकूण शिक्षक संख्या ५० पेक्षा जास्त असल्यास इयत्तानिहाय/विषयनिहाय वेगवेगळ्या परिषदा घेण्याची गरज आहे का हे बघणे.

## ६.३ सहभागाविषयी विनंती/सूचना

- विषयपत्रिकेसह (अजेंडा) दिनांक, ठिकाण व वेळ हे शिक्षण परिषदेच्या किमान तीन दिवस आधी सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवणे ज्यायोगे शिक्षकांना विषयानुसार तयारी करता येते व परिषदेमध्ये सर्वांचा नेमकेपणाने सहभाग मिळतो,
- आवश्यकतेनुसार DIECPD व गट साधन केंद्रातील साधन व्यक्तींना कल्पना देऊन मार्गदर्शनासाठी आमंत्रित करणे,
- अन्य साधन व्यक्तींच्या समावेश केला असल्यास त्यासंबंधी संपर्क व सहभाग निश्चिती करणे.

> केंद्रप्रमुख व केंद्र संसाधन गटाने शिक्षण परिषदेमध्ये कोणते विषय घेतले जावेत याचे नियोजन आधीच केले पाहिजे

## ६.४ शिक्षण परिषद मासिक विषय सूची नमुना

| केंद्र शिंदे – शिक्षण परिषद जुलै २०१७ | | | |
|---|---|---|---|
| **दिनांक – २८–७–२०१७ स्थळ – जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळदे** | | | |
| १ | शब्द सुमनांनी स्वागत, मागील शिक्षण परिषदेच्या विषयावर आढावा, आजची विषयपत्रिका वाचन | केंद्रप्रमुख | १२ ते १२.३० |
| २ | प्राप्त क्षमतांनुसार मूलनिहाय नियोजन म्हणजे काय? | केंद्र समूह साधन शिक्षक | १२.३० ते १.०० |
| ३ | मूलनिहाय नियोजनाचे नमुने तयार करणे व सादरीकरण | गटकृती – सर्व शिक्षक सहभाग व गटसादरीकरण | १.०० ते १.३० |
| ४ | **जेवणाची सुट्टी / मोकळीका** | | १.३० ते २.१५ |
| ५ | गटकृतीमुळे वर्गात होणारे बदल | केंद्र समूह साधन शिक्षक | २.२० ते २.४५ |
| ७ | नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण | शिक्षक | २.४५ ते ३.३० |
| ८ | प्रशासकीय विषय | केंद्रप्रमुख | ३.३० ते ४.१५ |
| ९ | प्रक्रियेबाबत सहभागींच्या प्रतिक्रिया/सूचना | शिक्षक | ४.१५ ते ४.३० |
| १० | पुढील नियोजन/दिशा/समारोप | केंद्रप्रमुख | ४.३० ते ५.०० |

मासिक शिक्षण परिषदेचा अजेंडा अथवा विषयपत्रिका कशी असावी याच्या संदर्भादाखल वरील नमुना दर्शविला आहे.

प्रत्येक मुलाची वाचन, लेखन आणि संख्याज्ञान या विषयात प्रभुत्त्व पातळीकडे वाटचाल व्हावी व सर्व मुलांना इयत्तानुरूप किमान अपेक्षित क्षमता प्राप्त व्हाव्यात या दृष्टीने शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रमाची आखणी आहे. त्यामुळे केंद्राच्या सध्याच्या संपादणूक पातळीचा अभ्यास करून वर्षभरासाठीचे ध्येय निश्चित करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगून वर्गातील प्रत्येक मुलाच्या संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी शिक्षकांना मदत आणि प्रेरणा देणे हा शिक्षण परिषदेचा हेतू आहे. केंद्राच्या शैक्षणिक गरजांचा प्राधान्यक्रम ठरवून शिक्षण परिषदांचे वार्षिक नियोजन तयार केले, तर गुणवत्ता वाढीच्या प्रयत्नांना निश्चित गती आणि दिशा मिळते. **शिक्षण परिषदांच्या वार्षिक नियोजनासाठी संदर्भ म्हणून पुढील नमुना दिलेला आहे.**

शिक्षण परिषदांच्या वार्षिक नियोजनामुळे, गुणवत्ता वाढीच्या प्रयत्नांना निश्चित गती आणि दिशा मिळते

## ६.५ शिक्षण परिषद वार्षिक नियोजन नमुना

| केंद्र शिंदे - शिक्षण परिषद वार्षिक नियोजन नमुना सन २०१८ -१९ | | | |
|---|---|---|---|
| **महिना** | **दिनांक** | **शिक्षण परिषद स्थळ** | **सर्वसाधारण विषय** |
| जून | २७-०६-२०१८ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा लहान शहादे | शाळापूर्व तयारी, विद्यार्थी उपस्थिती, पायाभूत चाचणी पूर्वतयारी, पालक सभा नियोजन |
| जुलै | २५-०७-२०१८ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वरूळ | पायाभूत चाचणी आढावा, मूलनिहाय नियोजन, वर्गप्रक्रिया, शाळा व्यवस्थापन समिती बैठक नियोजन |
| ऑगस्ट | २५-०८-२०१८ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दहिंदुले | सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन, गटपद्धती, पालकसभा आढावा |
| सप्टेंबर | २९-०९-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कठोरे डिगर | आकारिक चाचणी पूर्वनियोजन, मूलनिहाय नियोजन आढावा |
| ऑक्टोबर | २८-१०-२०१८ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोरीट | शाळा व्यवस्थापन समिती बैठक आढावा, आकारिक चाचणी आढावा, पुढील नियोजन |
| डिसेंबर | २३-१२-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुजलपूर | विद्यार्थी संचयिका आढावा व नियोजन, शाळा विकास आराखडा नियोजन |
| जानेवारी | २८-०१-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा समशेरपूर | शैक्षणिक पालक सभा नियोजन, वर्गप्रक्रिया नियोजन |
| फेब्रुवारी | २२-०२-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळदे | अध्ययनस्तर आढावा व नियोजन, शाळा सिद्धी |
| मार्च | २८-०३-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदे | संकलित पूर्वतयारी, विद्यार्थी संचयीका आढावा, पालक सभा |
| एप्रिल | २९-०४-२०१९ | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोराळे | संकलित आढावा , पुढील शैक्षणिक वर्षाचे नियोजन यावर चर्चा व दिशा ठरविणे |

प्रत्येक मुलाच्या संपादणूक पातळीत वाढ करण्यासाठी
शिक्षकांना मदत आणि प्रेरणा देणे हा शिक्षण परिषदेचा हेतू आहे

# ७ शिक्षण परिषदेच्या दिवशी

वरील पद्धतीने पूर्वतयारी झाल्यानंतर प्रत्यक्ष शिक्षण परिषदेच्या दिवशी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी.

## ७.१ जागा व बैठकव्यवस्था

- केंद्रप्रमुख व शिक्षक यांनी समान पातळीवर शक्यतो गोलाकार बसावे त्यामुळे संवाद सहज साधण्यास मदत होईल,
- उपक्रमांच्या सादरीकरणाची जागा ठरवताना सादरीकरणासाठी सुलभ व जेथून सर्वांना नीट दिसेल, ऐकू येईल अशी असावी,
- महिला व पुरुष शिक्षक यासाठी वेगवेगळी बैठकव्यवस्था बंधनकारक न करता कोणतीही गटकृती, चर्चा, सादरीकरण करताना त्यांच्या एकत्र सहभागासाठी पूरक अशी व्यवस्था असावी.

## ७.२ प्रक्रिया

- अनौपचारिक स्वागत,
- सुरुवात- वातावरण निर्मिती, (प्रार्थना, प्रेरणागीत, खेळ, संवाद इ.)
- शिक्षण परिषदेच्या अहवाल लेखनाची जबाबदारी निश्चित करणे, (सोडत पद्धत/चिठ्ठ्या टाकून)
- विषयपत्रिका वाचन- विषयपत्रिकेचे सर्वांसमोर वाचन करावे. त्यामुळे सर्वांना दिवसभरात काय करणार आहोत याची स्पष्टता येते,
- ज्या शाळेत शिक्षण परिषद आहे त्या शाळेचे सादरीकरण (नित्यक्रम, उपक्रम, शालेय विशेष घडामोडी),
- मागील शिक्षण परिषदेचा आढावा- इतिवृत्तानुसार मागील निर्णयाची अंमलबजावणी सद्यस्थिती समजून घेणे,
- वार्षिक आराखड्यातील मासिक नियोजन आणि सद्यस्थितीची सांगड घालणे,
- चांगल्या कामाबद्दल शिक्षकांचे कौतुक व प्रोत्साहन,
- या महिन्यातील केंद्रात घडलेल्या महत्वाच्या घडामोडीचा आढावा,
- विषय पत्रिकेनुसार विषयवार शिक्षकांचे सादरीकरण, (उपक्रम, कृती, प्रक्रिया)

केंद्राची गरज व सध्याचा अध्ययन स्तर यांचा आढावा घेवून त्यानुसार नियोजन आवश्यक

- आलेल्या विषयांवर गट चर्चा व अध्ययन-अध्यापन पद्धतीवर निर्णय- गटांचे सादरीकरण, (गटप्रमुख ठरवणे)
- दुपारचे जेवण,
- वातावरणनिर्मिती, (मोकळीका, खेळ)
- नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण,
- प्रशासकीय व इतर विषय उदा: स्थलांतर, पटनोंदणी, पालक भेट, मुलांच्या नोंदी इ.,
- केंद्राची गरज व सध्याचा अध्ययन स्तर लक्षात घेवून कोणते उपक्रम शाळा पातळीवर राबवायचे आहेत याचा निर्णय घ्यावा, त्याप्रमाणे शाळा निहाय कृती आराखडा व आढावा,
- वर्गांतर्गत प्रक्रिया व मूल निहाय नियोजन,
- आजच्या शिक्षण परिषद प्रक्रियेबाबत सहभागींच्या प्रतिक्रिया/सुचना,
- झालेल्या निर्णयांबाबत शिक्षकांच्या सहमतीची तात्काळ नोंद,
- पुढील शिक्षण परिषदेची तारीख व वेळ,
- आभार व समारोप.


## ७.३ प्रभावी प्रक्रियेसाठी काय करता येईल

- शिक्षक उपक्रम सादर करताना वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करू शकतात जसे प्रत्यक्ष करून दाखवणे, रोल-प्ले करून दाखवणे इ. उदा. इयत्ता ४ थी च्या वर्गातील बरीच मुले वाचन क्षमतेमध्ये मागे होती. वर्ग शिक्षकांनी या मुलांची क्षमता वाढवण्यासाठी वेगळे उपक्रम राबवले व मुलांची क्षमता वाढण्यास मदत झाली. शिक्षण परिषदे मध्ये त्या वर्ग शिक्षकांनी वर्गात राबवलेल्या उपक्रमांचे प्रात्यक्षिक दाखवले,
- शिक्षण परिषदेमध्ये सर्वांना बोलण्याची समान संधी द्यावी. मुलाखत, गटचर्चा अशा उपक्रमांतून न बोलणाऱ्या शिक्षकांना बोलते करता येते. शिक्षकांचे काम जाणून घेता येते व त्यातून शिक्षकांचा आत्मविश्वास वाढतो. महत्त्वाचे म्हणजे शिक्षण परिषद एकसुरी ना होता संवादात्मक होते,
- शिक्षण परिषदेमध्ये चर्चा व सादरीकरणांसोबतच खेळ, मोकळीका, गाण्यांचा समावेश केला असता सगळ्यांचा सहभाग टिकून राहण्यास मदत होते,
- एखाद्या क्षमतेसाठी शिक्षकांनी वर्गात मुलांना काय काम दिले होते आणि ते मुलांनी कसे केले आहे याचे नमुने शिक्षकांनी शिक्षण परिषदेमध्ये दाखविण्यास आणावे त्यामुळे प्रत्यक्ष काम बघून, चर्चेच्या माध्यमातून सुधारणेला संधी मिळून इतरांनाही दिशादर्शक उदाहरण राहते,

प्रक्रियेबाबतच्या प्रतिसादाचे स्वरूप हे दिवसभराची उजळणी असे न राहता वैयक्तिक उपयुक्तता व उपयोजन यांच्याशी जोडले गेले पाहिजे

- शिक्षण परिषदेच्या अंतिम टप्प्यात केंद्रप्रमुखांनी शिक्षकांना काही प्रश्नांच्या माध्यमातून दिवसभराच्या प्रक्रियेबाबत प्रतिक्रिया विचाराव्यात. या प्रतिसादाचे स्वरूप हे दिवसभराची उजळणी असे न राहता वैयक्तिक उपयुक्तता व उपयोजन यांच्याशी जोडले गेले पाहिजे. ज्यायोगे सर्व शिक्षकांचा सहभाग मिळवता येईल व चर्चांचा उपयोग शिक्षक वर्गात कसा करु शकतील या दृष्टीने त्यांना विचारप्रवृत्त करणारा ठरेल. यासाठी उदाहरणादाखल असे प्रश्न विचारता येतील.
  - आजच्या शिक्षण परिषदेमध्ये तुम्हाला वैयक्तिकरित्या काय शिकायला मिळालं?
  - आजच्या चर्चेतील कोणत्या गोष्टींचा वापर तुम्ही वर्गनियोजनामध्ये करणार आहात?
  - आजच्या सत्रातील कोणती गोष्ट तुम्हाला स्वत:ला आवडली?
  - कोणती नवीन माहिती मिळाली?

अशा अनेक प्रश्नांच्या माध्यमातून हे प्रतिसाद घेतले जाऊ शकतात. प्रतिसाद जाणून घेण्यासाठी योग्य प्रश्न विचारल्यास, ते शिक्षकांना चर्चेची जोडणी वर्गप्रक्रियांशी करण्यास मदत करतात. जर शिक्षण परिषदेतील चर्चांचा उपयोग प्रत्यक्ष वर्गांतर्गत प्रक्रियांमध्ये व्हायला हवा असेल तर प्रतिसाद सत्रामध्ये केंद्रप्रमुख कोणते प्रश्न, कशा पद्धतीने विचारतात यांचे स्वरूप बदलणे आवश्यक आहे.



**शिक्षण परिषदेतील चर्चांचा उपयोग प्रत्येक वर्गांतर्गत प्रक्रियांमध्ये होणे आवश्यक आहे**

## ७.४ शिक्षण परिषदांतील चर्चा – माहिती विश्लेषणाच्या आधारे घेणे

प्रभावी शिक्षण परिषदेसाठी हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा आहे, त्यामुळे त्याची सविस्तर मांडणी खाली केली आहे.

- शिक्षण प्रक्रियेचे मूळ उद्दिष्ट्य 'प्रत्येक मूल शिकणे' हे आहे. मग त्यासाठी प्रत्येक मूल अपेक्षित क्षमता प्राप्त करत आहे कि नाही हे सातत्याने बघणे आवश्यक आहे. किती मुलांना कोणत्या क्षमता प्राप्त आहेत? काही ठराविक क्षमतांमध्ये बहुतेक मुले मागे पडली आहेत का? काही विशिष्ठ शाळांतील मुले काही विशिष्ठ क्षमतांमध्ये इतरांच्या तुलनेत पुढे दिसत आहेत का? ही आणि अशी सर्व माहिती आपल्याला मुलांच्या शिकण्याच्या वस्तुस्थितीबद्दल अवगत करते. तसेच आहे त्या परिस्थितीत बदल घडवायचे असतील तर त्यांच्या नियोजनात नेमकेपणा ही देते. सांख्यिकी माहिती व तिचे विश्लेषण हे परिस्थितीची अचूक, वस्तुनिष्ठ मांडणी करते व बदलांसाठी कोणत्या घटकांवर भर दिला पाहिजे याची दिशा देते,
- मुलांच्या शिकण्यात निश्चित स्वरूपाचे बदल होण्यासाठी वर्गपातळी ते केंद्रपातळी या दरम्यान प्रत्येक टप्प्यावर काही न काही माहितीचे संकलन व मूल्यमापन होणे आवश्यक आहे. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन अथवा पायाभूत किंवा संकलित चाचण्या यांच्या माध्यमातून मूलनिहाय संपादणुकीचे संकलन होत असते. मूल्यमापनाची पद्धत कोणतीही असली तरी त्यातून मुलांची शैक्षणिक स्थिती व शैक्षणिक गरजा समोर येतात.याचाच उपयोग करून अध्ययन–अध्यापन प्रक्रियांचे नियोजन झाले पाहिजे,
- उपलब्ध माहितीचे सुयोग्य संकलन व काटेकोर विश्लेषण करण्यात आले तर प्रत्येक शिक्षकाला त्याच्या वर्गातील प्रत्येक मूल कोणत्या पातळीवर आहे हे समजते. तसेच विषयवार मुलांच्या संपादणुकीची सद्यस्थिती लक्षात येते. याआधारे शिक्षकांना मूलनिहाय, विषयनिहाय, नियोजन करण्यास मदत होऊ शकते. प्रत्येक मूल आहे त्या पातळीवरून अपेक्षित पातळीपर्यंत जायला हवे असेल तर माहिती विश्लेषणावर आधारित नियोजन व कृती याला पर्याय नाही,
- मूलनिहाय नियोजनासारखेच वर्गनिहाय, विषयनिहाय, शाळानिहाय व केंद्रनिहाय नियोजन तयार झाले पाहिजे. यासाठी केंद्रप्रमुखांना केंद्राचे विश्लेषण उपलब्ध असले पाहिजे. त्याआधारे केंद्रप्रमुखांना केंद्रातील गरजा, मुलांच्या क्षमता लक्षात घेऊन केंद्राचे पुढील नियोजन आणि योजना ठरविण्यास मदत होते,
- माहितीचे संकलन व त्यातून केलेल्या विश्लेषणाच्या आधारे केंद्रप्रमुखांना शिक्षण परिषदेमध्ये मुद्देसूद आणि नेमकेपणाने चर्चा घडवून आणता येते व याचा उपयोग शिक्षकांना विश्लेषणाच्या आधारे पुढील वर्ग नियोजन आणि अंमलबजावणी करण्यास होतो,
- माहिती संकलन व विश्लेषण हे फक्त शैक्षणिक गुणवत्ता विकासासाठीच नव्हे तर त्यावर थेट परिणाम करणाऱ्या प्रशासकीय कामकाजांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठीही अत्यंत महत्वाचे आहे. केंद्रप्रमुखांना विद्यार्थी उपस्थिती,शालेय पोषण आहार किंवा केंद्रासाठी लागणारी आवश्यक कोणतीही माहिती जर योग्य स्वरुपात संकलित व एका जागी उपलब्ध असेल तर तीच तीच माहिती पुन्हा पुन्हा संकलित करण्याचे प्रयत्न आणि वेळ वाचेल ज्यायोगे प्रशासकीय कामातील वेळ वाचून तो शैक्षणिक कामाला देणे सहज शक्य होईल.

प्रत्येक मूल अपेक्षित क्षमता प्राप्त करत आहे कि नाही हे सातत्याने तपासणे आवश्यक आहे

# ८ शिक्षण परिषदेनंतर

योग्य पूर्वतयारी, नियोजन व सर्वांच्या सक्रीय सहभागाला वाव देणारी शिक्षण परिषद हा शिक्षकांना समृद्ध करणारा, कामाला दिशा देणारा, उत्साह वाढविणारा असा अनुभव असतो. शिक्षकांच्या या शिकण्याचा फायदा मुलांना व्हायला हवा. तो कसा होणार? त्यासाठी परिषदेनंतर प्रत्यक्ष शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणा या दोहोंची महत्त्वाची भूमिका आहे. त्याकडे सविस्तरपणे पाहूयात.

## ८.१ शिक्षक आणि वर्गांतर्गत प्रक्रिया

**शिकण्याचा वापर दैनंदिन अध्ययन-अध्यापन प्रक्रियेमध्ये मूलनिहाय नियोजन, प्रत्यक्ष वर्गप्रक्रियांत उपक्रमांचा समावेश अशा प्रकारे होणे गरजेचे आहे. असे झाले तरच शिक्षण परिषदांतील उपक्रमांचा फायदा थेट मुलांना होईल.**

- मूल्यमापन चाचण्यांचा संदर्भ घेऊन वर्गाचे मूल निहाय नियोजन करणे,
- शाळा व वर्ग यांचे नियोजन करताना,केंद्राच्या मासिक नियोजनातले विषय विचारात घेतले आहेत याची खात्री करणे,
- नियोजनानुसार प्रत्यक्ष वर्गकृती करणे, प्रत्येक मूल पुढच्या टप्प्यावर जात आहे हे बघणे,
- उपक्रमांसाठी आवश्यक साहित्य निर्मिती, त्यांचा वापर व त्या उपक्रमांचे अहवाल तयार करणे,
- मुलांच्या नोंदी अद्ययावत करत राहणे,
- काही अडचण असल्यास इतर शिक्षक, केंद्रप्रमुख, केंद्र संसाधन गट यांची मदत घेणे.

## ८.२ केंद्रप्रमुख / केंद्र संसाधन सदस्यांच्या शाळाभेटी

**शिक्षण परिषदेचा अहवाल व महत्त्वाचे निर्णय केंद्रातील सर्व शिक्षकांपर्यंत केंद्रप्रमुख अथवा केंद्र संसाधन गटामार्फत पोचले पाहिजेत. शिक्षण परिषदेनंतर प्रत्यक्ष शाळा व वर्ग पातळीवर होणारे बदल नेमकेपणाने जाणून घेण्यासाठी शाळाभेटीची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. यामध्ये प्रत्यक्ष शिक्षक व केंद्रप्रमुख/ केंद्र संसाधन गट यांची महत्त्वाची भूमिका आहे.**

शिक्षण परिषदेतील नियोजनानूसार प्रत्यक्ष वर्गांतर्गत प्रक्रिया
व पर्यवेक्षीय यंत्रणेच्या शाळा भेटी महत्त्वाच्या

शिक्षण परिषदेमध्ये ठरविलेल्या बाबी प्रत्यक्षात शाळास्तरावर अमलात आणल्या जात आहेत ना आणि त्याचा फायदा प्रत्यक्षात मुलांना होतो आहे का याची शहानिशा करणे आणि जर होत नसेल तर मग भेटीदरम्यान शिक्षकांशी चर्चा करून त्यांच्या अडचणी सोडविणे हा वर्ग भेटी आणि आढावा घेण्यामागचा उद्देश आहे.

शाळा भेटींतून काही महत्त्वाच्या गोष्टी साध्य होतात, त्या म्हणजे नियोजित गोष्टी प्रत्यक्ष राबवल्या जात आहेत का याचा पाठपुरावा करता येतो. त्यासंबंधी काही अडचणी असल्यास आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करता येते. तसेच शाळांमध्ये राबविले जाणारे नवीन उपक्रम, शैक्षणिक साहित्याचा अभिनव वापर, प्रयोगशील शिक्षकांचे वर्ग हे प्रत्यक्ष पाहता येते. यामुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळते व केंद्रप्रमुखांना पुढील शिक्षण परिषदेची विषयपत्रिका व नवोपक्रम सादरीकरणाचे नियोजन करण्यास पण मदत होते. या भेटींची आखणी करताना खालील मुद्दे लक्षात घेतले तर या भेटी अर्थपूर्ण व उपयुक्त होतात.

- वर्गाचे मूल निहाय नियोजन, क्षमतेनुसार मुलांची यादी, त्यानुसार उपक्रमांचे नियोजन कसे केले आहे ते समजून घेणे,
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या नोंदी बघणे व आवश्यकतेनुसार बदल सुचविणे.
- मुलांच्या क्षमतावाढीचा प्रत्यक्ष मुले व शिक्षकांच्यासोबत खेळीमेळीच्या वातावरणाचा आढावा घेणे,
- शिक्षण परिषदेमधे ठरवलेले उपक्रम वर्गामध्ये राबवताना शिक्षकांना काही अडचणी येत आहेत का हे समजून घेणे,
- निर्णयांच्या अंमलबजावणीसंबंधी काही प्रश्न असल्यास ते सोडवणे,
- नवीन प्रयोग योग्य दिशेने केले जात आहेत ना हे बघणे,
- शिक्षकांना नाविन्यपूर्ण उपक्रम लिहिण्यास प्रोत्साहन देणे.



*शाळा भेटी*




*विद्यार्थी संचयिका*

## ८.३ मूल निहाय नियोजन कसे करावे?

मूल्यमापन चाचण्यांचा संदर्भ घेऊन मूल निहाय नियोजन ही शिक्षण परिषदेनंतरच्या टप्प्यातील अत्यंत महत्त्वाची कृती आहे. **मूल निहाय नियोजनात** मूल ज्या स्तरावर आहे. तेथून त्याला अपेक्षित अध्ययन निष्पत्तीपर्यंत नेण्यासाठी उपक्रम, अध्यापनाच्या कृती,पद्धती यांचा समावेश केला जातो.

मूल निहाय नियोजन खालीलप्रमाणे करता येईल.

- अध्ययन स्तर वा अध्ययन निष्पत्ती नुसार प्रत्येक मुलाची नोंद व त्यानुसार प्रत्येक मुलाचे मासिक नियोजन करणे,
- मुलांच्या नोंदी करताना प्रत्येक मुलाची विषयनिहाय क्षमता तपासून, प्रश्नानुसार अ,ब,क अशा श्रेणीमध्ये त्याची नोंद करणे,
- नियोजनामध्ये उपाय/कार्ययोजना काय आहे ते लिहिणे व त्याचा वेळोवेळी आढावा घेणे,
- या नियोजनातून मुलांना अपेक्षित क्षमता प्राप्त झाल्या कि नाहीत हे तपासून बघण्यासाठी मूल्यमापन चाचण्यांचा वापर करणे,
- मूलनिहाय नियोजनानुसार वर्गात विद्यार्थी संचयिका तयार करणे,
- केंद्र प्रमुखांनी काही शिक्षकांचे नियोजन बघून त्यांना प्रतिक्रिया देणे.



*मुल निहाय नियोजन*

## ८.४ विद्यार्थी संचयिका

विद्यार्थी संचयिका ह्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाचा एक महत्वपूर्ण भाग आहे.

संकलित मूल्यमापन चाचण्यांच्या विश्लेषणातून शिक्षक मुलांचे मूल निहाय नियोजन तयार करत असतात. हे मूल निहाय नियोजन वर्गप्रक्रियेत राबवत असताना मुलांना अपेक्षित क्षमता प्राप्त होत आहेत की नाहीत याचा पडताळा करणे आवश्यक आहे. हा पडताळा करण्यासाठी शिक्षक त्या क्षमतेनुसार सराव, कृती, लेखन काम, मूल्यमापन चाचण्या वापर करतात. या सर्व प्रक्रियेत मुलाने या संदर्भात वर्गात केलेले काम, तसेच मुलाने केलेले इतर काम उदा. चित्र, कविता, गोष्टी, निबंध, माहिती संकलन इत्यादी सर्व विद्यार्थी संचयिकेत संकलित केले जाते. यातून मुलामध्ये होणारा बदल, लागणारी मदत समजण्यास शिक्षकास सोपे जाते.

या विद्यार्थी संचयिका शिक्षण परिषदेत सादर केल्यास शिक्षक वर्गाचा आढावा, प्रत्यक्ष मूल निहाय काम आणि त्यातून झालेला बदल यांतून नेमकेपणाने मांडू शकतात.

याचा उपयोग शिक्षक शाळा व्यवस्थापन समिती बैठक,पालक सभा यामध्ये आपले काम प्रभावीपणे मांडू शकतात.



*शिक्षक मुलांचे काम पालकांसमोर मांडताना*

# १ प्रभावी शिक्षण परिषदेतून काय साध्य होते? अपेक्षित फलनिष्पत्ती

शिक्षण परिषदा का घ्याव्यात? त्यांचे उद्देश्य काय? त्यांची आदर्श प्रक्रिया काय असावी? या महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपण सविस्तर विचार केला. यानंतर स्वाभाविकपणे आपल्याला शिक्षण परिषदेतून काय साध्य व्हावे? शिक्षण परिषदांमुळे केंद्र स्तरावर कोणते बदल घडतात? या प्रक्रियेची परिणामकारकता कशी तपासावी? असे प्रश्न पडतात.त्यासाठी या मुद्द्यांचा आपण आता विचार करूयात.

शिक्षण परिषद – प्रक्रिया परिणामकारकता प्रत्यक्ष शिक्षण परिषदेच्या दिवशीची प्रक्रिया प्रभावी झाली का हे बघताना मुळात शिक्षण परिषदेतून सर्वसाधारणपणे काय अपेक्षित आहे हे समजून घेतले पाहिजेत. त्यासाठी खालील प्रश्न विचारता येतील.

- शिक्षण परिषदेतून शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक समस्यांची उत्तरे मिळाली का?
- सखोल चर्चेतून वेगवेगळ्या विषयांसंबंधी शिक्षकांच्या शंकांचे निरसन झाले का?
- स्थिती मापन व नियोजन यासाठी वापरली गेलेली संख्यात्मक माहिती ही अचूक, नेमकी, पुरेशी, व उपयुक्त होती का?
- संख्यात्मक माहितीचा प्रत्यक्ष वापर मूलनिहाय, शाळानिहाय व केंद्राचे नियोजन करण्यासाठी केला जात आहे का?
- केंद्रातील शिक्षक इतर शिक्षकांसोबत शिक्षण परिषदेतील विषयांवर चर्चा करताना दिसतात का?
- शिक्षकांना नवीन गोष्टी करून बघाव्याशा वाटत आहे का?
- शिक्षकांची समज, कौशल्ये, उत्साह व आत्मविश्वास वाढलेला जाणवतो का?
- शैक्षणिक वातावरण निर्मिती होण्यास मदत झालेली दिसते का?
- परिषदेमध्ये चर्चा केलेल्या शैक्षणिक संकल्पना, विचार याबाबत शिक्षकांमध्ये एकवाक्यता दिसते आहे का?
- शिक्षण परिषदांमधील निर्णयांचे आणि कृती आराखड्याचे परिणाम प्रत्येक वर्गातील प्रत्येक मुलाचा स्तर उंचावण्यासाठी होताना दिसत आहेत का?

वरील बाबी जर शिक्षण परिषदेनंतर घडताना दिसत असतील तर शिक्षण परिषदेची अपेक्षित फलनिष्पत्ती साध्य झाली असे म्हणण्यास हरकत नाही.

**शिक्षण परिषद प्रक्रिया परिणामकारकता तपासण्यासाठी नेमके प्रश्न विचारायला हवेत**

## प्रभावी शिक्षण परिषदेचे निर्देशक






# १० शिक्षण परिषद प्रकिया परिणामकारकता मापन प्रश्नावली : स्वयं-मूल्यमापन

## शिक्षण परिषद प्रकिया परिणामकारकता मापन प्रश्नावली : स्वयं-मूल्यमापन

टीप- सदर प्रश्नावली ही स्वयं-मूल्यमापन स्वरूपाची आहे, जे कोणी शिक्षण परिषदेचा भाग आहेत, ते आपल्या केंद्रातील अनुभवावरून आपले मत नोंदवू शकतात. आपल्या केंद्रातील शिक्षण परिषदांचा विचार करता जास्तीत जास्त वेळा कोणता पर्याय लागू होतो, याचा विचार करून मत नोंदवायचे आहे. सामान्यत: आपल्या केंद्रातील शिक्षण परिषदांची सद्यस्थिती काय हे तर यातून लक्षात येईलच, परंतु काय केल्याने आपल्या परिषदा अधिकाधिक परिणामकारक होतील याची स्पष्टदिशा देखील यातून मिळताना दिसेल.

दर ३ महिन्यांनी हे मूल्यमापन भरले तर आपल्या शिक्षण परिषदा आधीपेक्षा प्रभावी होत आहेत की नाही हे कळायला निश्चित मदत होईल.



*परिषदेतील उपक्रमांचा वर्गात वापर*

खालील प्रश्न काळजीपूर्वक वाचा व आपल्या केंद्रातील शिक्षण परिषदेबाबतच्या योग्य पर्यायावर खूण नोंदवा.

| | घटक | प्रश्न | नेहमी | बऱ्याचदा | कधी-कधी | कधीच नाही | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **नियमितता** | दर महिन्याला एक किंवा दर तीन महिन्यातून किमान २ शिक्षण परिषदांचे आयोजन होते. | ३ | २ | १ | ० | |
| २ | **आयोजन** | आपल्या केंद्रात केंद्र संसाधन गट स्थापन असून नियमित कार्यरत आहे. | ३ | २ | १ | ० | |
| ३ | | शिक्षण परिषदेच्या आधी केंद्र संसाधन गटाची नियोजन बैठक होते. | ३ | २ | १ | ० | |
| ४ | | शिक्षण परिषदेतील विषयांची आखणी करताना, शिक्षकांच्या गरजा जाणून घेतल्या जातात. | ३ | २ | १ | ० | |
| ५ | | प्रायोगिक उपक्रमांच्या सादरीकरणाच्या निवडीसाठी शाळा व शिक्षक भेटी होतात. | ३ | २ | १ | ० | |
| ६ | | शिक्षण परिषद तारीख व विषयपत्रिका या आगावू वेळेत शिक्षकांपर्यंत पोचते. | ३ | २ | १ | ० | |
| ७ | **उपस्थिती** | परिषदेसाठी ८५% हून अधिक शिक्षक उपस्थिती असते. | ३ | २ | १ | ० | |
| ८ | **सहभाग** | शिक्षकांकडून नवोपक्रमांचे सादरीकरण केले जाते. | ३ | २ | १ | ० | |
| ९ | | दरवेळी वेगवेगळे शिक्षक सादरीकरण करतात. | ३ | २ | १ | ० | |
| १० | | शिक्षण परिषदेमध्ये ५०% हून अधिक शिक्षक सक्रीय सहभाग घेताना दिसतात. | ३ | २ | १ | ० | |

| | घटक | प्रश्न | नेहमी | बऱ्याचदा | कधी-कधी | कधीच नाही | गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | **गुणवत्तेवर चर्चा आणि संख्यात्मक माहितीचा आधार** | मुलांच्या गुणवत्तेबाबत संख्यात्मक माहिती उपलब्ध असते. | ३ | २ | १ | ० | |
| १२ | | गुणवत्तेबाबत चर्चा संख्यात्मक माहितीच्या आधारे होते. | ३ | २ | १ | ० | |
| १३ | | परिषदेतील उपक्रमांचे सादरीकरण हे संख्यात्मक माहितीच्या आधारे केंद्रातील गरजा ओळखून त्यानुसार होते. | ३ | २ | १ | ० | |
| १४ | | परिषदेतील ८०%वेळ हा गुणवत्तेवरील चर्चे साठी तर केवळ २०% वेळ हा प्रशासकीय चर्चेसाठी वापरला जातो. | ३ | २ | १ | ० | |
| १५ | **आढावा व नियोजन** | संख्यात्मक माहितीच्या आधारे केंद्रातील गुणवत्तेचा नियमित आढावा घेतला जातो. | ३ | २ | १ | ० | |
| १६ | | गुणवत्ता वाढीसाठी केंद्राच्या उद्दिष्ट्यानुसार केंद्राचे मासिक नियोजन केले जाते. | ३ | २ | १ | ० | |
| १७ | | मूलनिहाय नियोजनाचा नियमित आढावा घेतलाजातो. | ३ | २ | १ | ० | |
| १८ | | शाळा व्यवस्थापन समित्या व लोकसहभाग यांच्या स्थितीचा आढावा घेतला जातो व त्यांचा सक्रीय सहभाग कसा मिळवावा यासाठी शिक्षकांचे सक्षमीकरण केले जाते. | ३ | २ | १ | ० | |
| १९ | **पाठपुरावा व प्रत्यक्ष मार्गदर्शन** | शिक्षण परिषदेतील नियोजनानुसार केंद्रात गोष्टी घडतात का याचा नियमित आढावा घेतला जातो. | ३ | २ | १ | ० | |
| २० | | परिषदेतील नियोजित गोष्टींच्या अंमलबजावणी साठी शिक्षकांना मदत मिळते. | ३ | २ | १ | ० | |
| | | **एकूण गुण संख्या** | | | | | |

**आपण खूण केलेल्या रकान्यातील संख्या गुण या रकान्यात भरा. एकूण गुण मोजा. या मूल्यमापनातील सर्व घटक हे प्रभावी शिक्षण परिषदेसाठी अतिशय आवश्यक आहेत, त्यामुळे आपले एकूण गुण हे ५० हून अधिक असतील तर आपल्या शिक्षण परिषदा या चांगल्या होत आहेत, परंतु त्यापेक्षा कमी गुण असतील तर ज्या घटकांमध्ये आपण कधीकधी किंवा कधीच नाही हे पर्याय निवडले असतील, त्या घटकांवर आपल्याला काम करण्याची गरज आहे.**

# ११ शिक्षण परिषदेसाठी महत्त्वाच्या भूमिका आणि जबाबदाऱ्या

## ११.१ केंद्र प्रमुख नेतृत्त्व

केंद्र पातळीवर प्रभावी शिक्षण परिषदेसाठी केंद्र प्रमुखांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. पण ही भूमिका यशस्वीपणे पार पाडण्यासाठी केंद्र प्रमुखांना इतर घटकांकडून सहकार्य मिळणे आवश्यक आहे. जिल्हा व तालुकास्तरीय अधिकारी व गट तसेच केंद्र संसाधन गट या सर्वांच्या समन्वयी कृतीतून केंद्रप्रमुखांना प्रत्यक्ष परिषदेची प्रभावी अंमलबजावणी करणे शक्य आहे. त्यामुळेच या प्रक्रियेची यशस्वीता ही गटातील प्रत्येक व्यक्तीची भूमिका व त्यांच्या परस्परपूरक आंतरक्रिया यांवर अवलंबून आहे. संबंधित प्रत्येकाला आपल्या भूमिकेची स्पष्टता असणे व त्याने/तिने ती जबाबदारीने पार पाडणे हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे या सर्वांच्या वैयक्तिक व सामुहिक स्वरूपाच्या काय जबाबदाऱ्या असायला हव्यात याचा विचार करूयात. शिक्षण परिषद प्रक्रियेत प्रामुख्याने जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, गटशिक्षणाधिकारी, साधन व्यक्ती - गट साधन केंद्र (BRC-RP), केंद्र प्रमुख, आणिकेंद्र संसाधन गट (CRG) यांची सामुहिक जबाबदारी असते परंतु यांच्या भूमिका वेगवेगळ्या असतात. सर्वप्रथम या प्रक्रियेचे नेतृत्व करणाऱ्या केंद्रप्रमुखांची व मग इतर महत्त्वाच्या घटकांच्या भूमिका सविस्तरपणे समजून घेऊया.

**शिक्षण परिषदेबाबत केंद्र प्रमुखांची भूमिका –**

शिक्षण परिषदेचे नेतृत्त्व हे केंद्रप्रमुखांनी करणे अपेक्षित आहे. त्यांचे प्रभावी नेतृत्वगुण हे शिक्षण परिषदेची परिणामकारकता वाढविणे, टिकविणे व शिक्षकांचे सक्षमीकरण यामधे महत्वाची भूमिका पार पाडतात. शिक्षण परिषदेच्या आधी, प्रत्यक्ष प्रक्रियेदरम्यान व परिषदेनंतर या तिन्ही टप्प्यांवर त्यांची विशेष भूमिका आहे. परिषदेच्या आधीचे नियोजन व नंतरची प्रक्रिया यांचा वर आपण सविस्तर विचार केलेला आहे. प्रत्यक्ष शिक्षण परिषदे दरम्यान त्यांची अपेक्षित भूमिका खालीलप्रमाणे:

- शिक्षण परिषदेच्या सुरुवातीला केंद्र प्रमुखांनी समर्पक शब्दांमध्ये प्रस्तावना करून सुरुवात करावी, प्रस्तावनेतून शिक्षकांना आजच्या बैठकीचा उद्देश स्पष्ट होईल याची काळजी घेणे गरजेचे आहे,
- मागील महिन्याच्या शिक्षण परिषदेचा आढावा घेणे तसेच त्याचे केंद्रांतर्गत काय परिणाम दिसून आले याची मांडणी करणे,
- विषयानुसार चर्चा घडवून आणणे,
- शिक्षकांच्या प्रश्नांची उकल चर्चेच्या माध्यमातून करणे,
- नियोजनाप्रमाणे वेळेचे व्यवस्थापन करणे,

- चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा बैठकीदरम्यान कामाचा उल्लेख करून प्रोत्साहन देणे,
- सर्व शिक्षकांचा सक्रीय सहभाग घेण्यासाठी विषयावर गटचर्चा कशी घडवून आणता येईल याची काळजी घेणे,
- कुठल्याही विषयावर फक्त चर्चा न करता चर्चेतून सगळ्यांना समजेच्या एका स्तरावर कसे आणता येईल आणि निर्णयापर्यंत कसे पोहोचता येईल याची काळजी घेणे,
- प्रत्येक शाळेचे गुणवत्ता वाढीचे लक्ष निश्चित करणे,
- ठरलेल्या निर्णयांचा आढावा कसा घेता येईल याचे नियोजन परिषदेतच शिक्षकांकडून करून घेणे,
- परिषदेदरम्यान काही छोटे खेळ किंवा मोकळीका घेणे, ज्यामुळे शिक्षकांना कंटाळा येणार नाही.

## ११.२ इतर महत्त्वपूर्ण घटक

**शिक्षण परिषदेबाबत जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था (DIECPD) यांची भूमिका –**

- राज्याचे शैक्षणिक धोरण व कृती योजना यांना अनुसरून जिल्हा पातळीवर शिक्षण परिषदेचे वार्षिक नियोजन ठरविणे,
- या नियोजनातील विषयांच्या प्राधान्यक्रमानुसार शिक्षण परिषदांचा दिशादर्शक अजेंडा व प्रभावी अंमलबजावणीसाठी अपेक्षित कृती याविषयी जिल्हा गुणवत्ता कक्षामध्ये चर्चेद्वारा स्पष्टता आणणे,
- जिल्ह्यातील शिक्षण परिषदांच्या कालावधीचे वेळापत्रक ठरवणे,
- तालुका गुणवत्ता कक्ष किंवा केंद्रप्रमुख सहविचार सभा यामध्ये सहभागी होऊन शिक्षण परिषदेच्या विषय व कृतीनियोजन यासंदर्भात स्पष्टता देणे,
- शिक्षण परिषदांमध्ये सहभागी होऊन गरजेनुसार स्वत: मार्गदर्शन करणे अथवा पर्यायी संसाधने उपलब्ध करून देणे,
- मागणी आधारित प्रशिक्षणांचे नियोजन करणे,
- शिक्षण परिषदांचा प्रत्येक तालुक्यावरून आलेल्या अहवालाचे संकलन करून पुढील कामाची दिशा ठरवणे,
- शिक्षण परिषदांच्या माध्यमातून आलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांचे संकलन करणे व उपक्रमशील शिक्षकांच्या, तालुक्याच्या कामाचा गौरव करणे.

**शिक्षण परिषदेबाबत गट शिक्षणाधिकारी यांची भूमिका –**

- जिल्ह्याचे नियोजन लक्षात घेऊन तालुक्यातील शिक्षण परिषदांचे वेळापत्रक विस्तार अधिकारी आणि केंद्र प्रमुखांच्या समन्वयाने आखणे,
- जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था अथवा इतर तज्ञ मार्गदर्शनाची आवश्यकता असल्यास DIECPD च्या मदतीने तजवीज करणे,
- वेळापत्रकानुसार नियोजित तारखा व वेळेत परिषदा होतील हे बघणे,
- दर महिन्याला किमान काही शिक्षण परिषदांना भेट देऊन चर्चा योग्य दिशेने चालू आहे की नाही हे बघणे, गरजेनुसार मार्गदर्शन करणे,
- तालुक्यातील चांगले काम करणाऱ्या शिक्षक, केंद्रप्रमुख, शाळा यांचा गौरव करणे, त्यांना काम मांडण्यासाठी संधी देणे व प्रोत्साहित करणे,
- शिक्षण परिषदांचा तालुकास्तरावर संकलित अहवाल तयार करून जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था येथे पाठवणे,
- चांगल्या शिक्षण परिषदांची उदाहरणे तालुक्यातील इतर केंद्रे, तसेच इतर तालुके, जिल्हा यांच्यापर्यंत नेणे,

**शिक्षण परिषदेबाबत विस्तारअधिकारी यांची भूमिका**

- तालुका स्तरीय नियोजनानुसार शिक्षण परिषदेबाबत बीटस्तरीय आढावा व नियोजन करणे,
- बीटमधील केंद्रात केंद्रप्रमुखांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन केंद्रस्तरावर मदत उपलब्ध करून देणे,
- केंद्रस्तरीय शिक्षण परिषदांची पूर्व तयारी केंद्र प्रमुख व केंद्र संसाधन गटाद्वारे करून घेणे,
- शिक्षण परिषदे दरम्यान शिक्षण परिषदेस भेटी देणे व गरज भासल्यास मार्गदर्शन करणे,
- बिटातील चांगल्या उपक्रमांची नोंद घेणे तसेच केंद्र प्रमुख व शिक्षकांना प्रोत्साहित करणे. त्याच्या उपक्रमांची तालुका बैठकीत मांडणी करणे,
- शाळा भेटी दरम्यान वर्ग प्रक्रियेत शिक्षण परिषदेतील घटकांचा आढावा घेणे,
- बीटस्तरीय अहवाल तयार करून तो तालुकास्तरावर सादर करणे.

शिक्षण परिषद प्रक्रियेची यशस्वीता ही गटातील प्रत्येक व्यक्तीची भूमिका व त्यांच्या परस्परपूरक आंतरक्रिया यांवर अवलंबून आहे

## शिक्षण परिषदेदरम्यान साधन व्यक्ती – गट साधन केंद्र (BRC-RP) यांची भूमिका –

शिक्षण परिषदेदरम्यान साधन व्यक्ती – गट साधन केंद्र (BRC-RP) यांची भूमिका ही केंद्र प्रमुखांना शैक्षणिक विषयात चर्चा घडवून आणण्यासाठी मदत म्हणून आहे.

- साधन व्यक्ती – गट साधन केंद्र (BRC-RP) यांची प्रमुख भूमिका ही शिक्षकांचे सक्षमीकरण करणे ही असल्याने, बैठकी दरम्यान शैक्षणिक समस्येवरील चर्चेमध्ये शिक्षकांना उत्तरे शोधण्यात मदत करण्यासाठी पुढाकार घेणे,
- साधन व्यक्ती – गट साधन केंद्र (BRC-RP) हे DIECPD शी संलग्नित असल्याने नवनवीन अध्यापन पद्धती, तसेच शिक्षण व्यवस्थेत होणारे नवनवीन बदल या विषयी शिक्षण परिषदांमध्ये शिक्षकांना माहिती देणे,
- कुठल्याही विषयावर गरज पडल्यास तयारी करून शिक्षकांना संबंधित विषयावर काय उपाय राहू शकतील याचे सादरीकरण करून दाखविणे.

## शिक्षण परिषदेदरम्यान केंद्र संसाधन समूहाची (CRG) भूमिका –

शिक्षण परिषद प्रक्रिया व केंद्रातील गुणवत्ता वाढ यामध्ये केंद्र संसाधन गटाची विशेषत्त्वाने भूमिका आहे. यामुळे केंद्रात केंद्र संसाधन गटाची स्थापना करणे, तसेच या स्वयंप्रेरित, उपक्रमशील शिक्षकांच्या नियमित बैठकांतून केंद्राची गुणवत्ता वाढीची दिशा व उद्दिष्ट्ये निश्चित करणे गरजेचे आहे. शिक्षण परिषद सुरु असतांना केंद्र संसाधन गटातील (CRG) शिक्षकांची भूमिका ही सुलभक, अपेक्षित कृतींची निश्चिती करणे, नियोजन अंमलबजावणीसाठी केंद्रप्रमुखांना सहाय्य आदर्श पाठ घेणे (Demonstration) अशा विविध पद्धतीची असते.

- केंद्र संसाधन गट हा तज्ञ शिक्षकांचा गट असल्याने त्यांनी एखाद्या शैक्षणिक समस्येवर ते कशाप्रकारे काम करीत आहेत याविषयी सादरीकरण करावयाचे असते,
- केंद्रातील शिक्षकांनी मांडलेल्या समस्या स्वतःच्या वर्गातील अनुभवाशी जोडून चर्चेच्या माध्यमातून उत्तरे शोधणे,
- गटामध्ये संबंधित विषयावर मुद्देसूद चर्चा घडवून आणणे,
- केंद्र संसाधन गटातील शिक्षक स्वतः वर्गात राबवीत असलेले नाविन्यपूर्ण उपक्रम इतर शिक्षकांसमोर सादर करणे किंवा शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून प्रत्यक्षात सादरीकरण करून दाखविणे,
- शिक्षण परिषदेच्या विषयांची पूर्तता होण्यासाठी केंद्र प्रमुख यांना सहकार्य करणे,
- केंद्रामध्ये दिसून आलेल्या समस्यांचा शोध घेऊन त्यावर उपाय शोधून शिक्षण परिषदेमध्ये त्या समस्येचा उलगडा करणे,
- महिन्याच्या शेवटी एकत्र बसून सर्वांच्या निरीक्षणांचे संकलन करून केंद्रातील शैक्षणिक गरजा ओळखणे व त्यानुसार पुढील शिक्षण परिषदेचे नियोजन करणे.





*केंद्र संसाधन गट बैठका*

**शिक्षण परिषदेबाबत मुख्याध्यापकांची भूमिका–**

- आपल्या शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित राहतील व मनापासून सहभागी होतील याची दक्षता घेणे,
- आपल्या शाळांतील शिक्षकांना त्यांचे उपक्रम सादर करण्यास प्रोत्साहित करणे,
- शिक्षण परिषदेचे नियोजन, आयोजन, व्यवस्थापन, लेखन, अहवाल संकलन यासाठी केंद्र प्रमुखांना मदत करणे,
- आपल्या शाळेतील शिक्षकांचा सहभाग घेत, शिक्षण परिषदेतील विषयांनुसार आपल्या शाळेतील उपक्रमांचे नियोजन करणे,
- शिक्षक आपल्या शाळेत उपक्रम घेत आहेत याची निश्चिती करणे व मदत करणे.

**शिक्षण परिषदेबाबत शिक्षकांची भूमिका –**

- सर्व शिक्षण परिषदांना वेळेवर व पूर्णवेळ उपस्थित राहणे,
- सर्व चर्चांमध्ये अभ्यासपूर्ण सक्रीय सहभाग घेणे,
- आपल्या शंका मांडून त्याचे निरसन करून घेणे,
- परिषदेतील अपेक्षा व सूचना यांच्या अनुषंगाने आपल्या वर्ग प्रक्रियांचे नियोजन करणे,
- आपल्या केंद्रातील इतर गुणवत्तापुर्वक उपक्रम नेमकेपणाने समजून घेऊन आपल्या कामात त्यांचा उपयोग करणे,
- आपल्या चांगल्या उपक्रमांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण करणे,
- आपला वर्ग व वर्गातील प्रत्येक मूल याचे गुणवत्तावाढी साठीचे नियोजन करणे व त्यानुसार अपेक्षित लक्ष गाठण्याचे प्रयत्न करणे.





# १२ निरंतर व प्रभावी प्रक्रियेसाठी काय करावे

जसे आपण पहिले की शिक्षण परिषद ही निरंतर व सार्वत्रिक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची परिणामकारकता अनेक गोष्टीवर अवलंबून असली तरी अभ्यासातून असे दिसते की यातील काही बाबी बहुतेक ठिकाणी लागू होतील अशा स्वरूपाच्या आहेत. यासाठी आपण आवर्जून काय करावे, काय टाळावे यांचा विचार करूयात.

## १२.१ काय करावे

- शिक्षक आणि मूल हे दोन घटक केंद्रस्थानी ठेवून नियोजन करणे
  - **एक म्हणजे शिक्षकांना येणाऱ्या शैक्षणिक अडचणी**
  - **दुसरे म्हणजे शैक्षणिक अडचणींवर उपाय शोधतांना मुलांचा विचार**
- शैक्षणिक समस्यांवर सुयोग्य उपाय शोधताना मूल केंद्रस्थानी ठेवून विचार होणे गरजेचे आहे. मुलांचे वय, त्यानुसार शारीरिक, मानसिक क्षमता लक्षात घेऊन उपक्रमांचे नियोजन हवे,
- शिक्षकांना येणाऱ्या वर्गांतर्गत अडचणींचा शिक्षण परिषदेतील चर्चांमध्ये समावेश- यामुळे शिक्षक त्या शिक्षण परिषदेला जास्त महत्व देतात तसेच त्यांच्या समस्यांविषयी कुणीतरी बोलतोय किंवा विचार करतोय अशी सकारात्मक भावना त्यांच्या मनात निर्माण होते. शिक्षकच स्वत:च्या समस्यांवर स्वतः चर्चा करून उपाय काढत असल्याने सर्वांमध्ये आपुलकीची भावना शिक्षण परिषदेबद्दल निर्माण होण्यास मदत होते,
- केंद्रातील शिक्षण परिषदेमध्ये ३५ ते ४० शिक्षक सहभागी होऊ शकतात. त्यापेक्षा अधिक शिक्षक केंद्रात असतील तर इयत्तेनुसार दोन स्वतंत्र शिक्षण परिषदांचे आयोजन भिन्न दिवशी करावे. त्यामुळे सर्व शिक्षकांना संधी मिळते व मुद्देसूद चर्चा होऊन सर्व विषयांना योग्य न्याय देता येतो,
- शिक्षण परिषदांच्या तारखा व स्थळ यांचे आधीच सर्वांच्या सोयीने नियोजन करून दर मासिक परिषदेमध्ये पुढील तारीख व स्थळ जाहीर करावे. त्यामुळे परिषदेस चांगली उपस्थिती लाभते,
- विषयपत्रिकेनुसार वेळेचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे नियोजित विषयांवर चर्चा होते, वेळेचा योग्य वापर व काटेकोरपण यामुळे शिक्षक प्रक्रियेकडे गांभीर्याने पाहू लागतात व तिची उपयुक्तता देखील वाढते.



## १२.२ काय टाळावे

- स्वागतातील औपचरिकता- हारतुरे, सत्कार,
- अनावश्यक व अस्थानी खर्च व भपकेबाजपणा- शिक्षण परिषद हा एकत्रित शिकण्याचा आनंददायी अनुभव आहे. निमंत्रित, भेटी, भोजन व्यवस्था, नियोजन यांच्यात साधेपणा बाळगणे आवश्यक आहे,
- एकांगी मांडणी- सर्वांना सहभागाची संधी न देणे, पक्षपातीपणा, नेहमी काही ठराविक शिक्षकच सादरीकरण तर करत नाहीत ना, हे तपासून टाळले पाहिजेत,
- विषयांची किंवा उपक्रमांची निवड करताना, केंद्राच्या गरजा, शिक्षकांच्या गरजा, मुलांच्या क्षमता, उपयुक्तता, सुयोग्यता विचारात न घेता ढोबळमानाने निवड करणे,
- उशिरा सुरुवात, अनावश्यक गोष्टींमध्ये वेळ वाया जाणे, मुद्देसूद चर्चा न होणे,
- उपक्रम सादरीकरणासाठी मुलांचा सहभाग घेताना,मुलांना दिवसभर खोळंबून ठेवणे,
- शिक्षण परिषदे दरम्यान काही गटांची स्वतंत्र चर्चा चालणे, काही प्रशासकीय कामे चर्चेच्या मधेच उरकून घेणे. यामुळे चर्चेतील गांभीर्य राहत नाही,
- भेट देणारे अधिकारी, तज्ञ यांची मोठी भाषणे, त्यामुळे शिक्षकांत चर्चा होत नाही.

# १३ शंका समाधान

**१) माझ्या केंद्रात शिक्षक संख्या जास्त आहेत तर सगळ्यांची एकाच वेळी शिक्षण परिषद घ्यावी का?**

शिक्षण परिषदांमध्ये सहभागी संख्या जास्त असेल तर सगळ्या शिक्षकांना विषय समजण्यास, सादरीकरण करण्यास मर्यादा पडू शकतात यावर पर्याय म्हणून केंद्रातील शिक्षक इयत्तेनुसार व विषयानुसार येवून शिक्षण परिषद होवू शकते.

**२) माझ्या केंद्रातील शिक्षण परिषदेला बाहेरील व्यक्तींना बोलावता येईल का?**

होय, केंद्राची गरज लक्षात घेता, यंत्रणेतील किंवा बाहेरील साधन व्यक्ती/ विषयतज्ज्ञ व्यक्तींचा सहभाग घेता येऊ शकतो. तसेच शिक्षण परिषदे मार्फत केंद्रातील चांगले काम यंत्रणेपर्यंत पोहचवता येवू शकते.

**३) त्या दिवशी शाळा बंद ठेवायच्या का?**

शासन निर्णय १ सप्टेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार शिक्षण परिषदेदिवशी शक्यतो शाळा बंद ठेवण्याची गरज वाटत नाही, त्या दिवशी सकाळच्या वेळेत शाळा घेऊन दुपारचा वेळ शिक्षण परिषदेसाठी देऊ शकता.

**४) शिक्षण परिषदेमध्ये सर्व शिक्षकांचा सहभाग कसा घ्यावा ?**

- शिक्षण परिषदेमध्ये कोणत्याही विषयावर गट पाडून गटचर्चा करणे, त्याचे सादरीकरणासाठी लिखित साहित्य तयार करणे, सादरीकरण करणे यातून सर्व शिक्षकांचा सहभाग मिळवता येऊ शकतो,
- प्रत्येक शिक्षण परिषदेमध्ये एखाद्या शिक्षकाची मुलाखत घेणे यातून प्रत्येक शिक्षकांना त्या शिक्षकाला प्रश्न विचारण्याची संधी देणे व यातून संवाद घडवून आणणे,
- सांघिक खेळ, भाषिक खेळ या खेळाच्या माध्यमातून सर्व शिक्षकांचा सहभाग मिळवता येऊ शकतो.

**५) शिक्षण परिषदेमध्ये गटकृती करताना शिक्षकांचे गट पडण्याच्या काय काय पद्धती असू शकतात?**

- शिक्षण परिषदेमध्ये गटकृती साठी गट पाडताना पुरुष व महिला शिक्षकांचा एकत्र सहभाग घ्यावा. यासाठी कोणत्या वेगवेगळ्या पद्धतीने गट पडू शकता हे पुढीलप्रमाणे,

  a) १,२,३,४ या क्रमाने शिक्षकांनी अंक मोजून यातील प्रत्येक अंकाच्या शिक्षकांचा एक गट याप्रमाणे ४ गटांचे विभाजन होते,

b) कोणत्याही संकल्पनेनुसार ४/५ शब्दांच्या चिठठ्या तयार कराव्यात. उदा- आकाश या संकल्पनेनुसार पक्षी, ढग, इंद्रधनुष्य, सूर्य, आकाशी या शब्दांच्या शिक्षक संख्येप्रमाणे चिठठ्या तयार करून प्रत्येकाला एक एक घेण्यास सांगावी. एकसारख्या शब्दांचा एक गट याप्रमाणे ५ गटांचे विभाजन करता येते.

**६) शिक्षण परिषदेमध्ये अध्ययन अध्यापन या खेरीज अजून कोणत्या विषयांचा समावेश व्हायला हवा?**

शिक्षण प्रक्रियेवर प्रभाव टाकणारा महत्त्वाचा घटक म्हणजे पालक व समाज, यांची प्रतिनिधी म्हणून काम करणारी शाळा व्यवस्थापन समिती व ग्राम पंचायतीची शिक्षणातील भूमिका यावर देखील शिक्षण परिषदेच्या व्यासपीठावर चर्चा होणे आवश्यक आहे. शिक्षकांचा लोकसंपर्क आणि सामाजिक कौशल्ये वाढावीत यासाठी आवर्जून प्रयत्न व्हावेत. यासाठी शिक्षण परिषदेत शाळा व्यवस्थापन समिती व ग्राम पंचायत यांची शिक्षणातील भूमिका, कर्तव्ये, जबाबदाऱ्या यांचेविषयी चर्चा व केंद्रात चांगला लोकसहभाग मिळविणाऱ्या शिक्षक व शाळा यांचे सादरीकरण यांविषयी नियमित नियोजन व आढावा घेणे गरजेचे आहे.

**७) शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत यांची शिक्षण परिषदेमध्ये काय भूमिका आहे?**

शिक्षण परिषद हे शिक्षकांच्या शिकण्याचे व्यासपीठ आहे. त्यामुळे प्रत्यक्ष शिक्षण परिषदेत शाळा व्यवस्थापन समिती अथवा लोक प्रतिनिधींची थेट भूमिका नाही, तरी शिक्षण परिषदेच्या आयोजनात स्थानिक म्हणून त्यांचा सहभाग घेता येतो. परंतु शिक्षण परिषदेला एखाद्या उत्सवाचे स्वरूप देऊन मग खर्च, मानपान अशा अवाजवी कारणांसाठी त्यांचा सहभाग घेणे अप्रशस्त आहे.

समाज सहभाग कसा मिळवायचा याचे एखादे उत्तम उदाहरण म्हणून केंद्रातील, काही शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे सादरीकरण हा शिकण्याचा अनुभव ठरू शकतो.

# १४

# एडलगिव्ह फाऊंडेशन आणि ‘दि कॉलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन’ बाबत



एडलगिव्ह फाऊंडेशन हे एडलवाईस ग्रुपचे CSR फाऊंडेशन असून देशभरात स्वयंसेवी संस्थांना पाठिंबा देणारी एक अनुदान संस्था आहे. याव्यतिरिक्त, देशभरातील अनुदानकर्ते आणि विश्वासार्ह स्वयंसेवी संस्थांना जोडून सामाजिक विकास आणि नवकल्पनांना प्रोत्साहित करणे आणि स्वयंसेवी संस्थांचे सक्षमीकरण करण्याचे काम करते.

एडलगिव्ह फाऊंडेशनने २०१६ मध्ये प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र (पीएसएम) कार्यक्रमांतर्गत शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सोबत सामंजस्य करार केला. या अंतर्गत दि कॉलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन (The Collaborators for Transforming Education) या कार्यक्रमाद्वारे संपूर्ण राज्यात प्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता (भाषा आणि गणित) वाढवून राज्यात शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याचे उद्दिष्ट आहे. एडलगिव्ह फाऊंडेशन अँकर फंडर असून इतर समान विचारसरणीच्या अनुदानकर्त्यांना (Funders) एकत्र आणले आहे.

**कार्यक्रमाची तीन मुख्य उद्दिष्ट्ये आहेत:–**

- मुलांची शैक्षणिक क्षमता वाढवणे,
- शैक्षणिक कार्यकर्त्यांचे व शिक्षण प्रणालीचे सक्षमीकरण,
- समुदाय सहभाग वाढवणे.



या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातील चार लक्षवेधी जिल्ह्यांमध्ये (अमरावती, गडचिरोली, परभणी व नंदुरबार) सन २०१६ पासून ग्यान प्रकाश फाउंडेशन व कैवल्य एज्युकेशन फाउंडेशन करीत आहेत.

# १५ ग्यानप्रकाश फाउंडेशन – संस्था संक्षिप्त परिचय

शाश्वत विकास साधायचा असेल तर प्राथमिक शिक्षणाचा दर्जा हा उत्तम असायला हवा. महाराष्ट्रात जरी शहरीकरणाचा विस्तार होत असला तरी आजही ६०% ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शासकीय जिल्हा परिषदांच्या शाळांवरच अवलंबून आहेत. यातील बहुतांश विद्यार्थी हे निम्न उत्पन्न गटातील आहेत, ज्यांना खाजगी शाळांचा खर्च परवडणारा नाही. ग्यानप्रकाश फाउंडेशन अशा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी काम करते.

दर्जेदार शिक्षण म्हणजे राज्यातील प्रत्येक मूल शाळेपर्यंत पोचणे, शाळेमध्ये नियमित उपस्थित राहणे व त्याच्या वयानुसार अपेक्षित क्षमता त्याला प्राप्त करता येऊन मूल २१ व्या शतकातील अपेक्षित कौशल्यांकडे सातत्याने प्रगती करत राहणे. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात हे शैक्षणिक परिवर्तन साधायचे असेल तर शिक्षक, शिक्षण व्यवस्था, पालक, समाज, लोकप्रतिनिधी व प्रशासकीय यंत्रणा या सर्वांचीच भूमिका महत्त्वाची आहे. शिक्षणावर प्रभाव टाकणाऱ्या या सर्व घटकांचे त्यांची अपेक्षित भूमिका आणि समन्वय याविषयी ग्यान प्रकाश फाउंडेशन संस्था सक्षमीकरण करत आहे. या सर्व घटकांचा आपापसातला संवाद व समन्वय वाढवणे, राज्याच्या शैक्षणिक धोरणांबाबत शिक्षक, पालक, केंद्रप्रमुख, प्रशासकीय यंत्रणा यांची समज वाढविणे, योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रक्रियांचे तपशील आखणे व प्रत्यक्ष बदलांतून जिल्ह्याचा विकासाला चालना देणे या प्रकारे संस्था कार्यरत आहे. अर्थातच हे सर्व काम हे शासकीय ध्येय धोरणे यांच्याशी सुसंगत असेच आहे.

### ध्येय :

जिल्हा परिषद शाळा व राज्य शिक्षण विभाग यांच्या सोबत, गुणवत्तेच्या नेमक्या समस्या ओळखून त्यानुसार ग्रामीण शैक्षणिक गुणवत्तेत ठोस सुधारणा घडवून आणण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे.

### ग्यान प्रकाश फाउंडेशनची मार्गदर्शक तत्वे :

ग्यानप्रकाश फाउंडेशन खालील मार्गदर्शक तत्वांवर काम करीत आहे.

- शासकीय यंत्रणा आणि ध्येय धोरणांशी सुसंगतता,
- यंत्रणेच्या माध्यमातून परिवर्तन,
- ग्यान प्रकाश फाउंडेशन– बदलांसाठी प्रेरकाची भूमिका,
    - समस्यांवर ठाशीव उपाययोजना न सुचविता, एकत्रितपणे समस्येचे नेमके स्वरूप समजून घेत व तेथील परिस्थितीस अनुकूल असे उपाय शोधण्यावर विश्वास,

- ❍ छोट्या क्षेत्रात प्रयोग- फलनिष्पत्ती,
- ❍ विस्तार- संबंध प्रस्थापित करणे- अंमलबजावणी- सक्षमीकरण- त्या कार्यक्षेत्रातून आपण बाहेर पडणे,

- उपलब्ध स्थानिक प्रतिभा ओळखून त्याचा सुयोग्य वापर.

## कार्यक्षेत्र :

गुणवत्ता वाढीच्या सर्व प्रयत्नांच्या केंद्रस्थानी 'मूल' आहे. पण हे मूल नेमकं कसं शिकते? हे समजून घेण्यासाठी संस्थेने सुरवातीला काही शाळांमध्ये शिक्षक आणि पालक यांच्या सहकार्याने कामास सुरुवात केली. या प्रयोगांमधून बदल कसे घडतात, याची नेमकी समज निर्माण झाली. मग काही शाळांपासून सुरु झालेला प्रवास विस्तारत गेला.

२०११ सालापासून संस्थेने महाराष्ट्र राज्य शासन विभागासोबत प्रथम खेड शिवापूर, पुणे, नंतर गुणवत्ता कक्षाच्या अंतर्गत तालुका वेल्हे, जिल्हा पुणे येथे शिक्षक, शाळा व्यवस्थापन समित्या व प्रशासकीय यंत्रणा यांच्या सोबत गुणवत्ता विकासाचे काम केले. या सर्व अनुभवातून २०१६ सालापासून संस्था महाराष्ट्र राज्याच्या विशेष लक्षवर्ती जिल्ह्यांपैकी, नंदुरबार व परभणी येथे, तसेच सोलापूर व सातारा अशा एकूण ४ जिल्ह्यांमध्ये काम करत आहे.

## प्रत्यक्ष अनुभव :

शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमांतर्गत संस्थेचा शिक्षण प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे सर्व घटक, त्यांच्याशी निगडीत शासकीय विभाग व प्रशासकीय यंत्रणेतील विविध स्तर या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांवर भर आहे. या बरोबरच प्रत्यक्ष वर्गात बदल होण्यासाठी शिक्षकांना मुलांसोबत काम करण्यासाठी मदत होईल अशा उपक्रमांची आखणी व अंमलबजावणीत सुलभता आणण्यासाठी सहकार्य याप्रकारे संस्थेचे काम आहे.

दूरगामी प्रभाव करणारे बदल घडवायचे असतील तर ते बदल वर्गपातळीवर व्हायला हवेत. प्रत्येक मुलाला केंद्रस्थानी धरून होणारे काम हे प्रत्यक्ष वर्ग, शाळा व साधारण समान भौतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती असलेल्या अशा शाळासमूहात म्हणजेच केंद्रात होणे गरजेचे आहे.

वर म्हणल्याप्रमाणे प्रत्येक मुलाच्या गुणवत्तेत सुधार आणि सर्व मुलांना किमान अध्ययन क्षमता प्राप्त हे प्रत्यक्षात साध्य करायचे असेल तर शैक्षणिक परिवर्तनाचा मुख्य भर हा केंद्रस्तरीय प्रक्रिया असला पाहिजे. केंद्र हे शैक्षणिक बदलांचे सर्वात छोटे पण अत्यंत प्रभावी एकक आहे कारण ते शाळा आणि मुले येथे चालणाऱ्या प्रत्यक्ष कामाच्या जवळ आहे. तसेच केंद्रस्तरावर ज्या प्रकारे काम चालते, त्याचा पुढे तालुका, जिल्हा व राज्य स्तरावर विस्तार करणे शक्य असते. यामुळे

**शैक्षणिक परिवर्तनाचा केंद्रबिंदू– ‘केंद्र’**
**शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया– ‘शिक्षण परिषद’**
**केंद्रस्तरीय प्रक्रियेतील मुख्य भूमिका– ‘केंद्रप्रमुख’**

या धारणेतून संस्थेने केंद्रस्तरीय प्रक्रियांवर भर दिला. अर्थातच ‘शिक्षण परिषद’ ही यातली मूलगामी बदल घडवून आणणारी प्रक्रिया आहे, हे जाणून ही प्रक्रिया अधिकाधिक परिणामकारक कशी होईल या विचाराने संस्थेने आपल्या कार्यक्षेत्रात अनेक प्रयोग केले.

‘नंदुरबार’ तालुका, जिल्हा नंदुरबार व ‘मानवत’ तालुका, जिल्हा परभणी येथील अनुक्रमे ४ व ५ केंद्रांमध्ये गटशिक्षणाधिकारी व सर्व केंद्रप्रमुख यांच्या उत्साही प्रतिसादाने प्रभावी प्रक्रियेसाठी शिक्षण परिषदा नियमित करणे, माहिती विश्लेषणाच्या आधारे मुद्देसूद करणे, परिषदांमधे सर्वांच्या सहभाग वाढविण्यासाठी कृती घेणे, परिषदेनंतर प्रत्यक्ष वर्गांतर्गत प्रक्रियेसाठी शाळाभेटी हे आणि असे सातत्यपूर्ण प्रयत्न करण्यात आले. परिणामस्वरूप दिवसेंदिवस या दोन्ही ठिकाणच्या परिषदा दर्जेदार होउ लागल्या, शिक्षकांचा उत्साह वाढून त्यांना शिक्षण परिषदा हवाहव्याश्या वाटू लागल्या, सर्वांत महत्त्वाचे म्हणजे केंद्राकेंद्रातील या शैक्षणिक चळवळीचा प्रभाव प्रत्यक्ष मुलांच्या गुणवत्ता विकासात स्पष्ट दिसू लागला.

आदर्श शिक्षण परिषदांचे प्रारूप केंद्राकेंद्रात दिसू लागले व हा आकडा शंभरच्या पुढे गेला. शिक्षक, केंद्रप्रमुख, गट शिक्षणाधिकारी व जिल्हास्तरीय यंत्रणा यांचा या प्रकीयेकडे पाहण्याचा दृष्टीकोन अत्यंत सकारात्मक झाला व त्यातूनच ही प्रक्रिया ही ‘शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया’ आहे हा विश्वास दृढ झाला. या बदलांची चुणूक आपणास खालील प्रतिक्रियांतून अनुभवयास मिळेल.

शैक्षणिक दृष्ट्या मागास समजल्या गेलेल्या व शाळा गळती, बालमजुरी, स्थलांतरण, आदिवासी तालुक्यामुळे भाषेच्या समस्या अशा विविध प्रतिकूल घटकांवर मात करत मानवत व नंदुरबार हे तालुके गुणवत्ता वाढीत भरीव प्रगती करू शकत आहेत हे पाहून ‘शिक्षण परिषद’ या प्रक्रियेची ताकद सर्वांपर्यंत पोहचावी व त्यायोगे प्रत्येक मूल शिकण्याचे स्वप्न प्रत्यक्षात यावे हाच संस्थेचा प्रयत्न आहे.

# १६ बदलांच्या पाऊलखुणा

## शिक्षण परिषद –गुणवत्ता वाढीचा एक महत्त्वपूर्ण दुवा

जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, पुणे,जिल्हा परिषद शिक्षण विभाग, पुणे व ग्यानप्रकाश फाउंडेशनयांच्या सहकार्यातून पुणे जिल्ह्यातील वेल्हा तालुक्यामध्ये दरमहा तालुका गुणवत्ता कक्षाच्या बैठका आयोजित करून; त्यामध्ये केंद्रप्रमुख, विषय साधन व्यक्ती, विस्ताराधिकारी, विशेष साधन व्यक्ती व ग्यानप्रकाश फाउंडेशनचे सदस्य यांच्या माध्यमातून सन २०१५-१६ मध्ये शिक्षणपरिषदेच्या माध्यमातून केंद्रप्रमुखांचेसक्षमीकरण करण्यात आले. त्यामधूनच प्रत्येक मूल शिकले पाहिजे यासाठी सर्व केंद्रप्रमुखांनी एकत्र येवून शाळाभेटी केल्या. त्याला पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांची उत्तम साथ लाभली. त्यामधूनच सर्वांच्या सहकार्याने दि.१०/१०/२०१६ रोजी मा.प्रधान सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरीय शिक्षण परिषद आयोजित करून शिक्षकांना मदत करण्यात आली. त्यावेळेस फक्त ७ शाळा प्रगत होत्या, त्यानंतर सन २०१६-१७ मध्ये सर्वांनी केलेल्या टीमवर्कमुळे ववरिष्ठांच्या सहकार्यामुळे सुमारे ९० पेक्षा जास्त शाळा प्रगत झाल्या.शिक्षण परिषदांच्या माध्यमातून मूल, शिक्षक व प्रक्रियेतील अधिकारी यांची गुणवत्ता विकास दृष्टीने बांधणी घडत असून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा मार्ग सर्व मुलांसाठी खुला होतो. हा प्रक्रियेतील निरीक्षक घटकांचा प्रत्यक्ष अनुभव आहे. यावरूनगुणवत्ताविकासामध्येकेंद्रस्तरीय शिक्षण परिषदांची महत्त्वपूर्ण कामगिरी स्पष्ट होते.

**श्री. अरुण जाधव**
**अधिव्याख्याता, सी.पी.डी.विभाग,**
**महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे.**

## शिक्षण परिषदेमुळे विद्यार्थी गुणवत्ता वाढ व विकासावर उत्तम परिणाम

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र सन २०१५-१६ या उपक्रमामध्ये १००% वर्ग, १००% शाळा, १००% केंद्र प्रगत करणे, १००% तालुका प्रगत करेण. एक ही मुल अप्रगत राहणार नाही यासाठी ज्ञानरचनावाद व इतर उपक्रमातून अध्ययन अध्यापन सुरु झाले. वेल्हे तालुक्यात त्यावेळी ग्यानप्रकाश फाउंडेशन गुणवत्ता वाढ व विकास यासाठी अध्ययन अध्यापण प्रक्रियेमध्ये मदत करत होते. विद्यार्थी प्रगत होण्यासाठी आम्ही केंद्र संमेलनामध्ये प्रत्येक मूल प्रगत कसे होईल यासाठी चर्चा, शिक्षकांचे अनुभव, शिक्षकांना मूल शिकण्यात येणाऱ्या अडचणी, शिक्षकांचे उपक्रम, सादरीकरण सुरु केले. त्याचा उपयोग इतर शाळांना होवू लागला. ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या विचारविनियमाने व सहकार्याने शिक्षण परिषदेचे स्वरुप, कार्य, पद्धती याचे नियोजन केले. व अंमलबजावणी सुरु केली. यामध्ये विद्यार्थी गुणवत्ता वाढ व विकास याचाच विचार करण्यात आला. यांचा उपयोग होवून प्रत्येक मूल प्रगत झाले. त्यातून पुढे केंद्र, तालुका प्रगत झाला. यातून शिक्षकांचा आत्मविश्वास वाढला. एकमेकांच्यात मित्रत्वाची भावना वाढीस लागली. त्यामुळे एकंदरीत विद्यार्थी गुणवत्ता वाढ व विकासावर उत्तम परिणाम झाला.

**श्री. शिळीमकर लक्ष्मण विष्णुबा**
**केंद्रप्रमुख - मार्गासनी, ता. वेल्हे, जि. पुणे**

## शिक्षण परिषद –जिल्हा गुणवत्ता वाढीसाठी अंमलबजावणीचे एक प्रभावी माध्यम

जिल्हा परिषद शिक्षण विभाग व जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था यांच्या माध्यमातून जिल्हा गुणवत्ता कक्षाच्या मासिक आढावा बैठकीचा प्राप्त अहवाल व शक्य असल्याल उपस्थिती या प्रकारे परभणी मध्ये जिल्हा स्तरावरून शिक्षण परिषदेचे नियोजन केले. तसेच तालुका निहाय, केंद्र निहाय आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना व प्रोत्साहन देत होतो व मासिक बैठकीत पुढील नियोजन करत होतो. त्याच बरोबर स्तर निर्धारण करून मुलांच्या अप्राप्त क्षमता विश्लेषित करून मुल निहाय विचार या माध्यमातून प्रत्येक मुलाचा विचार या मध्ये करत गेलो. पर्यायाने शाळा स्तरापर्यंत जिल्हा नियोजनातील उपक्रम व तेथील गरजा यांचा एकत्रित विचार करून तो विषय शिक्षण परिषदेमुळे सहज व प्रभावीपणे गुणवत्ता वाढीसाठी वर्ग स्तरापर्यंत पोहचला.

**मा. पृथ्वीराज बी.पी.**
**मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी**

## शिक्षण परिषद – शैक्षणिक गरजा, मासिक नियोजन व आढावा यासाठी मध्यवर्ती व्यासपीठ

जिल्हा परिषद शिक्षण विभाग आणि जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, नंदुरबार यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व केंद्रांमध्ये दरमहा शिक्षण परिषदा आयोजित केल्या जात आहेत. शिक्षकांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी आणि पर्यायाने विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्यासाठी शिक्षण परिषदा महत्वाची भूमिका बजावतात. प्रत्येक विद्यार्थ्याने अपेक्षित क्षमता प्राप्त करावी यासाठी तसेच आपल्या केंद्राच्या शैक्षणिक गरजा ओळखून त्यानुसार मासिक नियोजन आणि आढावा घेणे यामध्ये केंद्रप्रमुखांची मोठी जबाबदारी आहे आणि ‘शिक्षण परिषद’ हे यासाठी मध्यवर्ती व्यासपीठ आहे. जिल्हा शैक्षणिक गुणवत्ता कक्ष बैठकांच्या माध्यमातून याचा नियमित आढावा घेतला जात आहे.

सदर शिक्षण परिषदा प्रभावी होण्यासाठी ग्यानप्रकाश फौंडेशन या संस्थेच्या वतीने जी मार्गदर्शिका तयार करण्यात येत आहे, निश्चितच त्याचा उपयोग शिक्षण परिषदांच्या आयोजनात सहभागी असलेल्या सर्व घटकांना पर्यायाने आपल्या जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी होईल याची मला खात्री आहे.

**आपलाच,**
**विनय गौडा जी. सी.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नंदुरबार**

## जिल्हा गुणवत्ता कक्षाचे नियोजन

परभणी जिल्ह्यात या शैक्षणिक वर्षात DIECPD च्या प्राचार्या यांच्या अध्यक्षतेखाली 'जिल्हा गुणवत्ता कक्षाने' शिक्षण परिषदा अधिक प्रभावी राबविण्याचे ठरविले. केंद्रस्तरावर केंद्रप्रमुख हे शिक्षण परिषदांचे नेतृत्व करत असतात. त्यासाठी DIECPD ने केंद्रप्रमुखांना प्रत्येक शिक्षण परिषदेच्या अगोदर शिक्षण परिषदेच्या नियोजनात जसे की, शिक्षण परिषदेचे विषय, वेळापत्रक, CRG सदस्यांची निवड, विषय सहाय्यकांची गरज याबाबतीत सहभागी करून घेतले. त्यामुळे जिल्हाभरात ८६ केंद्रांच्या ठिकाणी एकाच दिवशी व एकाच वेळापत्रकानुसार शिक्षण परिषदा प्रभावीपणे घेणे जमू शकले.

**श्री. अनिल गौतम**
**प्राचार्य, DIECPD, परभणी**

## उत्तम मार्गदर्शिका...

शिक्षक समृद्धीसाठी एक उत्कृष्ट पर्याय म्हणजे शिक्षण परिषद होय. शिक्षण परिषदेतून प्रत्यक्ष विद्यार्थी गुणवत्तेसाठी सामुहिक व वैयक्तिक प्रयत्न केले जातात. जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था नंदुरबार, नंदुरबार जिल्ह्यात सन २०१८-२०१९ पासून शिक्षण परिषदेचे आयोजन करत आहेत.

शिक्षण परिषद प्रक्रिया टप्प्याटप्प्याने नियोजनबद्धरित्या आयोजित केल्यामुळे, तसेच याबाबत विविध संस्था अधिकारी, पदाधिकारी यांच्या जबाबदाऱ्या सुस्पष्ट केल्यामुळे, अंमलबजावणीमध्ये सुसूत्रता यायला मदत झाली. शिक्षकांना यातून आवश्यक शैक्षणिक मदत मिळाली व यशस्वी उपक्रमांचे एकमेकांत आदानप्रदान होऊ लागले, त्यामुळे या प्रक्रिया नक्कीच मार्गदर्शक व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी परिणाम देणाऱ्या अशा ठरल्या. अशी ही प्रक्रिया निश्चितच योग्य व फलनिष्पती दायक आहे याबाबत कोणतीही शंका नाही.

**श्री. शिवाजी सिताराम ठाकूर**
**अधिव्याख्याता**
**जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था नंदुरबार**

## गट संसाधन समूहाचे शिक्षण परिषदेसाठी प्रभावी नियोजन

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत २०१६ सालापासून ग्यानप्रकाश फाउंडेशन संस्थेने नंदुरबार तालुक्याची गुणवत्ता विकास कार्यक्रमासाठी प्रारूप म्हणून निवड केली. नंदुरबार शिक्षणविभाग, DIECPD व ग्यानप्रकाश फाउंडेशन यांच्या समन्वयातून नंदुरबार तालुका शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी केंद्रपातळीवर एक महत्वाचे व्यासपीठ म्हणजे शिक्षण परिषद होय. त्यामुळे या प्रक्रिया नियमित, सर्व शिक्षकांचा सहभाग मिळवणाऱ्या व प्रत्येक मुलाच्या गुणवत्तेचा विचार करणाऱ्या कशा होतील यावर प्रामुख्याने भर देण्यात आला. जिल्हा, तालुका, केंद्र, शाळा व स्वयंसेवी संस्था यांच्या समन्वयातून एक आदर्श शिक्षण परिषद प्रक्रिया कशी राबवता येऊ शकते याची अनेक उत्तम उदाहरणे या दरम्यान नंदुरबार तालुक्यात निर्माण झाली. २०१६ पासून ते आजतागायत या प्रक्रियेमध्ये सातत्य व सुधार याकडे लक्ष दिले गेले आहे. या वर्षीपासून शिक्षण परिषदांचे पूर्वनियोजन केंद्रप्रमुख सहविचार सभेमध्ये DIECPD तालुका संपर्क अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली केले जाते. यामुळे सर्व केंद्रांमध्ये एकवाक्यता व सुसूत्रता येण्यास मदत होते. या शैक्षणिक वर्षात नंदुरबार DIECPD मार्फत शिक्षण परिषदांच्या केल्या जाणाऱ्या नियोजनामुळे फक्त तालुक्यातच नाही तर पूर्ण जिल्हा स्तरावर एकवाक्यता येण्यास मदत झाली आहे. जिल्ह्याची शिक्षण परिषदेसाठीची अंमलबजावणी यातून प्रभावी झाली आहे. यामुळे या आदिवासीबहुल विभागात चांगली शैक्षणिक वातावरण निर्मिती झाली असून विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया घडून विद्यार्थी अध्ययनस्तर व अध्ययननिष्पत्ती यात प्रगती झालेली आहे.

**डॉ. सी. के. पाटील**
**गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नंदुरबार**

## प्रभावी व उपक्रमशील शिक्षण परिषदेचा प्रत्यक्ष मूल शिकण्याशी सहसंबंध......

माझ्या केंद्रात शिक्षण परिषदा केव्हा आहेत असे शिक्षक विचारतात कारण शिक्षण परिषदेचा दिवस चुकवणे कोणत्याही शिक्षकाला आवडत नाही. शिक्षण परिषदेत दरवेळी नाविन्यपूर्ण विषयांवर चर्चा, संवाद, नाट्य, परिसंवाद घेतले जातात. शिक्षणप्रक्रियेत शिक्षकांबरोबर विद्यार्थीही किती महत्वाचा आहे यावर लक्ष केंद्रित केले गेल्याने, शिक्षकांना आपल्या अध्यापनातील गरजा, मूल शिकण्यातील अडचणी आपोआप समजून येतात, नाविन्यपूर्ण कृतींची माहिती मिळते, व आपल्याला अजून विद्यार्थी गुणवत्ता संपादणूकीसाठी काय करावे लागणार आहे, याचे आत्मपरीक्षण करण्याची संधी प्राप्त होते. माझ्या केंद्रात शिक्षण परिषद ही शिक्षकांसाठी एक आनंददायी प्रक्रिया असते. त्यात प्रत्येकाला सहभाग घेता येतो, आपले विचार मांडण्याची संधी मिळते.

**श्री. वसंत जाधव-केंद्रप्रमुख**
**केंद्र-सारंगखेडा, जिल्हा-नंदुरबार**

## शाश्वत तालुका बदलासाठी शिक्षण परिषद एक प्रभावी माध्यम

परभणी जिल्हा मानव विकास निर्देशांकात मागास गणला गेला व असर सर्वेक्षणातही महाराष्ट्रात २० व्या क्रमांकावर होता त्या पूर्वीपासून ग्यानप्रकाश फाउंडेशन तालुक्यात शिक्षण विभागासोबत कार्य करीत होते. माझ्या पुर्वानुभवातून गुणवत्तावाढीचे लक्ष्य शिक्षक क्षमता बांधणीचे काम केल्याशिवाय शक्य नाही ही खूणगाठ मनाशी होती. म्हणूनच शिक्षण परिषद हा प्रभावी मार्ग असल्याचे एकूण तालुक्याची स्थिती पाहता लक्षात आले.

आम्ही शिक्षण परिषदेचे आयोजन सर्वप्रथम तालुका स्तरावर केले व सर्व शिक्षकांशी संवाद साधून, त्यानुसार तालुका शैक्षणिक बदलाचे प्रारूप कसे असावे याचे नियोजन केले. शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुखांनी सुलभकाची भूमिका पार पाडावी व तालुका स्तरीय नियोजनातील घटकांचा पाठपुरावा केला जावा या करिता मासिक आढावा व नियोजन बैठका तालुका गुणवत्ता कक्षा मार्फत सुरु केल्या. त्यानुसार आत्ताही चालू महिन्यात शिक्षण परिषदेची विषय पत्रिका काय असावी, कोणत्या मुद्द्यांना प्राधान्य देण्यात यावे या बाबी चर्चिल्या जातात व त्या नुसार मासिक शिक्षण परिषदेचे नियोजन केले जाते. केंद्रप्रमुख आपल्या केंद्रात शिक्षण परिषदेच्या तयारीसाठी केंद्र संसाधन गटाची बैठक बोलावतात व त्या नुसार केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन केले जाते. ज्ञानरचनावाद, ERAC तंत्र, भाषा व गणित पेटीचा वापर, अध्ययन निष्पत्ती, मूलभूत क्षमता विकास, मूल निहाय नियोजन, उपक्रमांचे सादरीकरण या विशेष बाबींचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. प्रभावी शिक्षण परिषदांच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०१६ ते २०१८ मध्ये मानवत तालुका परभणी जिल्ह्यात गुणवत्तेमध्ये अग्रक्रमावर पोहचला.

भाषा विषयात: ८०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांत ३० टक्क्याने वाढ

४०% पेक्षा कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांत १३ टक्क्याने घट

गणित विषयात: ८०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांत २४ टक्क्याने वाढ

४०% पेक्षा कमी गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांत ९ टक्क्याने घट

मा. श्री. पृथ्वीराज बी. पी., मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. परभणी यांनी सदर कार्याचा मागोवा घेतला. त्यानुसार जिल्हा गुणवत्ता कक्षाच्या मदतीने चालू शैक्षणिक वर्षात परभणी जिल्ह्यात याची अंमलबजावणी करण्यात आली. परिणाम स्वरूप असर २०१६ मध्ये गुणवत्तेत २० व्या क्रमांकावर असलेला परभणी जिल्हा, २०१८ च्या सर्वेक्षणात ९ व्या क्रमांकावर पोहचला. यामध्ये शिक्षण परिषदेचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे मला वाटते.

**श्री. संजय ससाणे**
**गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, मानवत, जिल्हा परभणी**

## वर्गनिहाय शिक्षण परिषदा – एका नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात.....

मानवत तालुक्यातील केकरजवळा हे एक केंद्र. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये या केंद्रात एकूण ६१ शिक्षक होते. शिक्षकांच्या मोठ्या संख्येमुळे शिक्षण परिषदेमध्ये सर्व विषयांवर मुद्देसूद चर्चा होणे अवघड होत असे. यामुळे शिक्षण परिषदांचा मूळ हेतू साध्य होत नाही हे लक्षात आल्यावर, स्वत: शिक्षक म्हणून काम केलेल्या केंद्रप्रमुख श्री.मोरे सरांनी यावर चांगली उपाययोजना केली, ती म्हणजे इयत्तानिहाय शिक्षण परिषदेचे आयोजन! ऑक्टोबर २०१६ रोजी पायाभूत चाचणीचे विश्लेषण करण्यासाठी केंद्र प्रमुखांनी केंद्रातील २ री व ३ री च्या शिक्षकांची पहिल्यांदाच वर्गनिहाय शिक्षण परिषद आयोजित केली.

या आधी परिषदेमध्ये कोणते विषय असावे? साधारण कोणत्या विषयाला किती वेळ दिला पाहिजे?, शिक्षकांकडून कोणते प्रश्न येऊ शकतात? शिक्षकांना व्यक्त होण्यासाठी कसा वाव देता येईल? व नाविन्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण कसे करता येईल याला विचार केला गेला. या परिषदेमध्ये फक्त इयत्ता २ री व ३ री च्याच शिक्षकांचा समावेश होता, त्यामुळे चर्चा मुद्देसूद झाल्या, शिक्षकांच्या प्रश्नांना उत्तरे मिळाली व याचा थेट उपयोग शिक्षकांना वर्ग घेण्यासाठी झाला. या अनुभवावरून मानवत तालुक्यामध्ये इयत्तानिहाय शिक्षण परिषदा घेण्यास सुरुवात झाली. मर्यादित शिक्षक संख्या व त्या त्या इयत्तेचा विचार करून घडणारी सखोल चर्चा यामुळे शिक्षण परिषदांचे मेळाव्याचे स्वरूप जाऊन,त्याची जागा अभ्यासपूर्ण शैक्षणिक चर्चांनी घेतली. आता नियमितपणे या केंद्रात प्रत्येक महिन्याला वर्गनिहाय शिक्षण परिषदा होतात. शिक्षण परिषदेमध्ये सर्वांना सहभागाची संधी व काहीतरी नवीन गोष्टी शिकण्यास, अनुभवण्यास मिळणार या विश्वासाने शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग वाढतो आहे.

**केकरजवळा केंद्र**
**तालुका-मानवत, जिल्हा-परभणी**

## मंगरूळ केंद्रात गुणवत्ता वाढीसाठी शिक्षण परिषदेचा उपयोग

मानवत तालुक्यात गेल्या तीन वर्षात शैक्षणिक गुणवत्ता वाढीत होत असलेल्या बदलांमध्ये शिक्षण परिषद या प्रक्रियेचा महत्वाचा वाटा आहे. मंगरूळ केंद्रात केंद्रप्रमुख श्रीमती माया जानराव यांनी केलेल्या शाळाभेटी, वर्गभेटी, यातून पुढे आलेली निरीक्षणे, नाविन्यपूर्ण उपक्रम, वर्गपातळीवर केंद्रप्रमुखांचे प्रत्यक्ष सादरीकरण यातून शिक्षण परिषद प्रभावी होण्यास मदत झाली. केंद्रातील शिक्षण परिषदांमध्ये मुलांच्या अध्ययन पातळीच्या विश्लेषणातून (प्रगत शैक्षणिक पायाभूत, संकलित) केंद्रप्रमुख आणि शिक्षक यांना मूलनिहाय क्षमतांचे विश्लेषण प्राप्त झाले. या विश्लेषणातून केंद्रस्तरावर कोणत्या क्षमतांवर काम करावे लागेल याची दिशा स्पष्ट झाली. शिक्षण परिषदेत केंद्रप्रमुखांच्या नेतृत्वात या घटकावर शिक्षकांशी संवाद होवून नाविन्यपूर्ण उपक्रम पुढे आले, या माध्यमातून शिक्षकांना नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आदान-प्रदान करण्याची संधी उपलब्ध झाली व त्यातून शिक्षकांना आवश्यक मदत मिळण्यास सुरवात झाली. केंद्रातील शिक्षकांच्या मूल निहाय नियोजन व त्याअनुरूप वर्गकृती यामुळे मुलांच्या अध्ययनक्षमतांमध्ये लक्षणीय फरक पडताना दिसू लागला. सन २०१६-१७ मधील प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत घेतल्या गेलेल्या चाचण्यांच्या निकालामध्ये मंगरूळ केंद्रात पायाभूत चाचण्यांच्या तुलनेत संकलित चाचण्यांमध्ये भाषा आणि गणित विषयात १०% गुणवत्ता वाढ झालेली दिसून येते. यामुळे शिक्षण परिषदा या केंद्रातील गुणवत्ता विकासासाठी सर्वाधिक परिणामकारक व्यासपीठ कसे आहे हा विश्वास सार्थ ठरलेला दिसतो.

**मंगरूळ केंद्र**
**तालुका-मानवत, जिल्हा-परभणी**

## शिक्षण परिषदेमधील वेळेचा सदुपयोग आणि नियोजनाची गरज

खरेतर केंद्रपाळीवर शिक्षकांनी एकत्र येऊन शैक्षणिक गरजांवर प्रभावीपणे चर्चा करण्याचा एक दिवस आपल्याला शिक्षण परिषदेच्या माध्यमातून मिळतो. या एका दिवसामध्ये आपण वेळेचे जितके चांगल्या पद्धतीने नियोजन करू त्याप्रमाणे शैक्षणिक चर्चांना तितका अधिक वेळ मिळू शकतो. या सर्वांचा विचार करूनच आमच्या केंद्रात एक सकारात्मक बदल करायचे आम्ही ठरवले आणि एक निर्णय घेतला की सुरुवातीचा स्वागत समारंभामध्ये जो वेळ जायचा हा वेळ सत्कारणी लावण्यासाठी स्वागत सर्वांचे करायचे मात्र ते शब्दसुमनांनी. या स्वागताने हार, शाल, श्रीफळ देऊन केल्या जाणाऱ्या सत्कारापेक्षा वेळ ही वाचतो आणि तो वेळ शैक्षणिक गरजांवर चर्चा करण्यासाठी मिळतो. याचा अनुभव ही आम्ही आमच्या केंद्रात घेत आहोत. कधी कधी मात्र ज्या गावांमध्ये शिक्षण परिषद असते त्या गावातील गावकऱ्यांसाठी किंवा अधिकाऱ्यांसाठी ही औपचारिकता महत्वाची वाटते, अशा वेळी भावनांचा आदर ठेवण्यासाठी शिक्षण परिषदेच्या नियोजनावर त्याचा परिणाम न होऊ देता परिषदेआधी अर्धा तास ही औपचारिकता आपण पूर्ण करू शकतो.

**श्री. पंडित सोमा चौरे**

**केंद्रप्रमुख, सुंदरदे केंद्र, ता.नंदुरबार, जिल्हा-नंदुरबार**

## वर्गा पासून... वर्गापर्यंत - शिक्षण परिषद प्रक्रिया

पूर्वीचे शिक्षण परिषदेचे स्वरूप आणि आताचे बदलते स्वरूप यात खूप फरक आहे. आताच्या शिक्षण परिषदा या केवळ कागदपत्रांची, सूचनांची, परिपत्रक राबविण्याची पूर्तता न राहता चांगल्या परिणामकारक विचारांची देवाण-घेवाण करण्याचे मुक्त व्यासपीठ झालेले आहे. महिनाभर, वर्षभर वर्गात नेमके कोणते उपक्रम कशा प्रकारे राबवावे, ज्यातून अध्ययन अनुभव आणि अध्ययननिष्पत्ती कशी साध्य होऊ शकते याची दिशा मिळून अध्यापनात फायदा होऊ लागला.

मी स्वतः केंद्र संसाधन गटातील एक सदस्य आहे त्यामुळे शिक्षण परिषदांचे नियोजन हे केंद्र संसाधन गटातील नियोजन आणि पूर्व तयारीमुळे किती प्रभावी होऊ शकते याचा अनुभव मी घेत आहे. काही वेळा आपण खूप प्रयत्न करूनही आपल्याला विद्यार्थ्यांची अध्ययननिष्पती साध्य करण्यासाठी आपल्याला त्रास होतो, अशावेळी शिक्षण परिषदेतील नवोपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांकडून उपक्रमांची माहिती मिळते. प्रात्यक्षिक सादरीकरणामुळे उपक्रम कसा राबवावा ते कळते. त्याचा प्रत्यक्ष वर्गपातळीवर वापर करताना योग्य दिशा व त्याची परिणामकारकता लक्षात येण्यास मदत होते. शिक्षण परिषदेचा प्रवास हा खर तर 'वर्गप्रक्रिया ते शिक्षण परिषद' आणि 'शिक्षण परिषद ते वर्गप्रक्रिया' असा आहे. उपक्रमांची किंवा माझ्या वर्गातील विशिष्ट घटकातील परिणामकारकता मुक्तपणे मांडण्याचे स्वतंत्र व्यासपीठ आहे असे वाटते.

**रोहिणी बाविस्कर**

**शिक्षिका, राजापूर शाळा, सुंदरदे केंद्र, जिल्हा नंदुरबार**

# संदर्भ

१. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र

२. केंद्र प्रमुख भूमिका

३. केंद्र संसाधन गट, तालुका संसाधन गट, जिल्हा संसाधन गट

४. शिक्षण परिषद


५. केंद्र संमेलन



# टिप्पणी







केंद्र शासनातर्फे पारित 'बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार २००९' या कायद्यान्वये भारत देशातील प्रत्येक मुलाचा गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा हक्क मान्य केला गेला आहे. राज्यातील प्रत्येक मुलाचा हा अधिकार निश्चित करण्याच्या दृष्टीने २२ जून २०१५ रोजी महाराष्ट्र राज्य शासनाने 'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' हा शासन निर्णय जाहीर केला. याद्वारे प्राथमिक शिक्षणात 'गुणवत्ता विकास' केंद्रस्थानी असण्याची आवश्यकता ठोसपणे मांडली गेली. हे प्रत्यक्षात साध्य करायचे असेल, तर प्रत्येक मुलाची सध्याची शैक्षणिक पातळी समजून घेऊन, तेथून तो/ती पुढे कसा जाईल याकरिता प्रयत्न झाले पाहिजेत. हे शैक्षणिक परिवर्तन म्हणजेच, प्रत्येक मुलाच्या गुणवत्तेत सातत्याने सुधार आणि सर्व मुलांना किमान अध्ययन क्षमता प्राप्त करणे होय. परिवर्तनाच्या विचारात अपेक्षित आहे, प्रत्येक मुलाचा विचार करतानाच सर्व मुलांना लागू पडतील असे उपाय शोधणे व त्यासाठी समर्पक व्यासपीठ शोधणे. शिक्षण व्यवस्थेचा विचार करता, 'केंद्र' हे शाळा आणि प्रत्यक्ष मुले यांच्याशी दैनंदिनरित्या निगडीत असे शैक्षणिक बदलांचे सर्वात छोटे पण अत्यंत प्रभावी व पुनरावृत्ती शक्य असलेले एकक आहे. प्रत्येक मुलाशी, प्रत्येक शाळेशी जोडलेले, 'केंद्र' प्रत्यक्ष कामाच्या जवळ असते आणि केंद्रस्तरीय कामाची पुनरावृत्ती पुढे तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर विस्तारासाठी करणे शक्य असते. **त्यामुळेच शैक्षणिक परिवर्तनाचा मुख्य भर 'केंद्र' हाच असला पाहिजे.**

**शैक्षणिक परिवर्तनासाठीचे एकक – 'केंद्र'**

**शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया – 'शिक्षण परिषद'**

**केंद्रस्तरीय प्रक्रियेतील मुख्य भूमिका – 'केंद्रप्रमुख'**

जिथे प्रभावी शिक्षण परिषदा होत आहेत तिथे केंद्राचे व तालुक्याचे शैक्षणिक चित्र पालटताना दिसते आहे, त्यामुळेच संपूर्ण राज्यासाठी वरील समीकरण महत्त्वाचे ठरते.

केंद्र परिवर्तनाच्या प्रक्रियेत केंद्रप्रमुखांचे नेतृत्त्व हे अत्यंत महत्त्वाचे आहे. तितकीच महत्त्वाची आहे ती परिवर्तनाची प्रक्रिया, म्हणजेच 'शिक्षण परिषद' एक दिशादर्शक सातत्यपूर्ण प्रक्रिया,जिच्यामुळे केंद्रातील सर्व शिक्षकांना एकत्रितपणे, सर्वांच्या सहभागातून, संख्यात्मक माहितीच्या वापरातून, शैक्षणिक विचारमंथन करत, समस्यांवर उपाय शोधण्याची, नवीन शिकण्याची व नेमक्या गरजांवर आधारित नियोजन व आढावा घेण्याची संधी मिळते.

शिक्षण हक्क कायद्यास अपेक्षित ते साध्य करण्याची ताकद असलेली ही शैक्षणिक परिवर्तनाची प्रक्रिया राज्यातील प्रत्येक केंद्रात अधिकाधिक सजगतेने व प्रभावीपणे राबवण्यासाठी सहाय्यभूत ठरावी या हेतूने ही पुस्तिका तयार केली आहे.